# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६५ वे अंक १३५) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) शनिवार, दि.२३ मे २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


## घरी बोलावून मंत्री केले, ही माझी चूक; बच्चू कडूंवर उद्धव ठाकरेंची टीका

मुंबई दि.२२ (प्रतिनिधी)- शिवसेना नेते उद्धव ठाकरेंनी बच्चू कडू यांच्यावर शिंदेसेनेत प्रवेश केल्याप्रकरणी जोरदार टीका केली आहे. ''आपल्यातून जो गेला तो देखील जुना शिवसैनिकच होता. घरी बोलावून मंत्री केलं ही माझी चूक होती'', अशी टीका उद्धव ठाकरेंनी कडू यांच्यावर केली. बच्चू कडू यांनी काही दिवसांपूर्वी प्रहार जनशक्ती राजकीय पक्ष शिंदेंच्या शिवसेनेत विलीन करुन धुनष्यबाण हाती घेतला. या पक्षप्रवेशावरुन उद्धव ठाकरेंनी बच्चू कडूंवर निशाणा साधला आहे.

''आपल्यातून जो गेला तो जुना शिवसैनिकच होता. घरी बोलवून मंत्री केला ही माझी चूक झाली. लोभापायी जे गेले त्यांना जाऊ द्या, लढणारे कार्यकर्ते माझ्याबरोबर आहेत, याचा मला आनंद आहे'', असे उद्धव ठाकरे म्हणाले. प्रहार जनशक्ती पक्षाचे परभणी जिल्हाप्रमुख शिवलिंग बोधणे यांनी मातोश्री येथे त्यांच्या सहकाऱ्यांसह शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षात प्रवेश केला. यावेळी उद्धव ठाकरे बोलत होते. शिवसेना नेते आमदार अंबादास दानवे आणि इतर पदाधिकारी उपस्थित होते.

यापूर्वी सामनाच्या अग्रलेखातून कडू यांच्यावर जोरदार टीका करण्यात आली होती. ''अमरावती विभागात बराच काळ आमदार व मंत्री असलेले श्रीमान बच्चू कडू यांनी स्वतःला मिंधे गटात विलीन करून जिवंत समाधी घेतली,'' असे टीकास्त्र अग्रलेखातून कडू यांच्यावर सोडण्यात आले.

# राज्यभरात इंधन टंचाईचं संकट अधिक गडद!

## पेट्रोल पंपावर लांबच लांब रांगा, अनेक पंपावर हाणामारीच्या घटना; खरिपाच्या तोंडावर बळीराजा दुबार संकटात

मुंबई दि.२२ (प्रतिनिधी)- एकीकडे राज्यात पेट्रोल-डिझेलसाठी रांगा पाहायला मिळतायत. पण दुसरीकडे याच रांगांवरून राजकारणही रंगतंय. पण या सगळ्यात नाहक त्रास सहन करावा लागतोय तो सर्वसामान्य नागरिकांना आणि शेतकऱ्यांनाच. असं असतानाच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी मात्र देशात पुरेसा इंधनसाठा असल्याचं विधान केलंय. तर सरकारमधील काही मंत्र्यांनी इंधनटंचाईला साठेबाजी जबाबदार असल्याचं म्हटलंय. असं असलं तरी या साऱ्यामुळे राज्यभरात इंधन टंचाईचे भीषण संकट अधिक तीव्र होताना दिसत आहे. आधीच निसर्गाच्या लहरीपणानं हैराण झालेला बळीराजा आता पेट्रोल-डिझेल तुटवड्याच्या संकटामुळे पुरता हतबल झाला आहे. राज्यात अनेक भागात डिझेल मिळत नसल्यानं ट्रॅक्टर बंद पडलेत. ज्याच्याकडे डिझेल इंजिननं पाणीउपसा होतो त्यांना आता पिकांना पाणी देता येत नाहीये. तर शेतमाल बाजारात नेण्यासाठीही शेतकऱ्यांची फरफट सुरू आहे. सरकारच्या नियोजनाच्या अभावाचा सर्वात मोठा फटका पुन्हा एकदा बळीराजालाच बसतोय. दरम्यान डिझेलसाठी अनेक ठिकाणच्या पेट्रोल पंपावर नागरिक शेतकऱ्यांची झुंब




उडाल्याने दिवसरात्र थांबून सुद्धा डिझेल मिळत नसल्याने संतापाच्या भरात पेट्रोल पंपावरील कर्मचाऱ्यांना मारहाणीच्या घटना घडल्याचे वृत्त आहे. अशीच परिस्थिती आणखी काही दिवस राहील्यास नागरिकांच्या संतापाचा उद्रेक होतो की काय? असे वाटु लागले आहे.

कधीकाळी मराठवाड्यातील गावागावात पाण्यासाठी रात्र जागून काढण्याची वेळ यायची. विहिरी, टँकर आणि हंडाभर पाण्यासाठी रांगा लागायच्या. पण काळ बदलला आणि आता तीच रात्र जागून काढण्याची वेळ डिझेलसाठी आली आहे. शेतकऱ्यांच्या अंगणात पाण्यासाठी ठेवलेले कॅन आज डिझेलने भरले जात आहेत. डिझेल तुटवड्यामुळे मराठवाड्यात शेतकरी आणि वाहनचालकांवर मोठं संकट ओढवलं आहे. एकेकाळी पाण्यासाठी रांगा लावणारा मराठवाडा. आज डिझेलसाठी रात्र जागून काढतोय. पाण्याच्या हंड्यांची जागा आता डिझेलच्या कॅननी घेतली आहे. आणि हा संघर्ष फक्त इंधनाचा नाही. तर शेती, रोजगार आणि ग्रामीण जीवन वाचवण्याचा आहे.

वाशिममध्ये सातव्या दिवशीच्या मध्यरात्री शेतकरी आणि वाहनचालकांची डीझल मिळवण्याकरिता जत्रेच स्वरूप पाहवयास मिळालंय. आज दिवसभरात विविध पंपावर चकरा मारू डीझल न मिळाल्याने रात्री उशिरापर्यंत शेतकऱ्यांनी गर्दी केल्याचं चित्र पाहवयास मिळालं.

बुलढाणा जिल्ह्यातील पंपावर लहान मोठ्या वाहनधारकांच्या दीर्घ रांगा कायम आहे. इंधनाचा साठा नाही वा अपुरा साठा आहे, अनेक ठिकाणी इंधन नाहीच्या पाट्या लागल्या आहेत. यामुळे कारचालक असो की दुचाकी, आटो चालक असो की ट्रॅक्टर चालक, सर्वांचे इंधन टंचाई ने बेहाल केले आहे. बुलढाणा जिल्ह्यात किरकोळ अपवाद वगळता असेच भीषण चित्र आहे

मोताळा तालुक्यातील जनता जनार्दनाचे, लहान मोठ्या वाहन धारकांचे असेच बेहाल होत आहे. कडक उन्हात व बेचाळीस डिग्री सेलसियस तापमानात पेट्रोल, डिझेल साठी दीर्घ रांगामध्ये उभे राहण्याची पाळी आली. कधी कधी रात्री अपरात्री पंपसमोर उभे राहावे लागत आहे. पेट्रोल अभावी प्रवास, पोट भरण्यासाठीची धावपळ ठप्प पडली तर डिझेल नसल्याने खरीप हंगामाच्या मशागतीची कामे रेंगाळली आहे. मात्र याकडे पाहवयास ना नेत्यांना ना अधिकाऱ्यांना वेळ आहे. सगळे आव्हानतच गुंग आहे.

या पार्श्वभूमीवर अखेर शुक्रवारी, मोताळा तालुक्यातील काही वाहन धारकांचा संयमाचा बांध सुटल्याचे दिसून आले. वाहन धारक आणि शेतकऱ्यांनी आज दुपारी बुलढाणा- मोताळा मार्ग रोखला. पेट्रोल डिझेल मिळत नसल्याने शेतकरी प्रचंड संतप्त झाल्याचे पाहावंयास मिळाले.

# तेंदूपत्ता गोळा करणाऱ्या चार महिला वाघिणीच्या हल्ल्यात ठार

चंद्रपूर दि.२२ (प्रतिनिधी)- जंगलात तेंदूपत्ता तोडण्यासाठी गेलेल्या महिलांवर वाघिणीने केलेल्या हल्ल्यात तब्बल ४ महिलांचा मृत्यू झाल्याची भयंकर घटना चंद्रपूरच्या सिंदेवाही तालुक्यात घडली आहे. या घटनेत इतर काही महिला जखमी झाल्याची माहिती आहे. गतवर्षी १० मे रोजी सिंदेवाही तालुक्यातील मेंढा (माल) जंगलात वाघाने ३ महिलांचा बळी घेतला होता. त्यानंतर ही दुसरी मोठी घटना आहे. दरम्यान, काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी या महिलांचा बळी हा प्रशासकीय अनास्थेने केलेला घात असल्याचा आरोप केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सिंदेवाही तालुक्यातील गुंजेवाही जंगलात शुक्रवारी सकाळी ९ च्या सुमारास ही घटना घडली. गुंजेवाही येथील १३ महिलांचा एक समूह शुक्रवारी सकाळी तेंदूपत्ता वेचण्यासाठी जंगलात गेल्या होत्या. तेंदूपत्ता वेचण्याचे काम सुरू असताना या महिलांवर वाघिणीने अचानक हल्ला चढवला. अचानक झालेल्या या हल्ल्यामुळे या महिला घाबरल्या व जिवाच्या आकांताने सैरावैरा पळत सुटल्या. पण वाघाने ४ महिलांवर झडप घातली. त्यात त्यांचा बळी गेला. इतर महिलांपैकी १ महिला ओरडतच गावात आली. तिने आरडाओरडा करत गावकऱ्यांना घडलेल्या घटनेची माहिती दिली.

गावकरी लाठ्याकाठ्या घेऊन घटनास्थळी धाव घेतली. त्यावेळी तिथे ४ महिलांचे मृतदेह आढळून आले. यावेळी इतर महिला सुखरूप असल्याची माहिती आहे. वनविभागानेही घटनास्थळी पोहोचून स्थितीचा आढावा घेतला. तसेच पुढील तपास सुरू केला. या घटनेत कवडूबाई दादाची मोहुर्ले (४५), अनुबाई दादाजी मोहुर्ले (४६), संगीता संतोष चौधरी (३६) व सुनीता कौशिक मोहुर्ले (३३) या ४ महिलांचा बळी गेला. यामुळे मोहुर्ले व चौधरी कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, गावात हळहळ व्यक्त केली जात आहे.

काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी या महिलांचा बळी हा प्रशासकीय अनास्थेने केलेला घात असल्याचा आरोप केला आहे. ते म्हणाले, चंद्रपूर जिल्ह्यातील सिंदेवाही तालुक्यातील गुंजेवाही जंगलात तेंदूपत्ता गोळा करण्यासाठी गेलेल्या चार निष्पाप भगिनींचा वाघिणीच्या हल्ल्यात झालेला मृत्यू ही निव्वळ दुर्घटना नाही, तर तो प्रशासकीय अनास्थेने केलेला घात आहे! हे सरकार नक्की झोपलंय कुठे? कष्टकऱ्यांच्या जिवाची किंमत शून्य का? जर एखादा वाघ मारला गेला तर लगेच चौकशी समित्या बसतात, पण एकाच वेळी ४ गरीब महिलांचे बळी जातात तेव्हा प्रशासन एवढं सुस्त कसं राहू शकतं? ग्रामीण भागातील जनतेने स्वतःचा जीव मुठीत धरून किती दिवस जगायचं? सरकारने आमच्या संयमाचा अंत पाहू नये, असे वडेट्टीवार म्हणाले.

## महाराष्ट्रात मतदार याद्यांची मॅपिंग सुरु

मुंबई दि.२२ (प्रतिनिधी)- राज्यात एसआयआर प्रक्रिया ही अत्यंत पारदर्शकपणे राबवली जाणार असून कोणत्याही पात्र मतदाराचे नाव यादीतून कमी केलं जाणार नाही असं आश्वासन राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस चोकलिंगम यांनी दिलं. २००२ सालची मतदार यादी समोर ठेऊन मॅपिंग केलं जाणार असून त्यामध्ये आपलं किंवा आपल्या पालकांचं नाव जुळतंय का हे पाहण्याचं आवाहन त्यांनी केलं.

राज्यातील एसआयआर प्रक्रिया ही २९ जुलै पर्यंत सुरू राहणार असून मतदारांच्या घरी बीएलओ प्रत्यक्ष भेट देऊन माहिती गोळा करणार आहेत. तसेच बीएलओ घरी आल्यानंतर कुणी उपस्थित नसेल तर त्यांना २९ जुलै नंतरही त्यांचे नाव नोंदवता येणार असल्याचं चोकलिंगम म्हणाले. तसेच महाराष्ट्रातल्या ७२ टक्के मतदारांचे मॅपिंग पूर्ण झाल्याची माहितीही चोकलिंगम यांनी दिली.

केंद्रीय निवडणूक आयोगाने राज्यातील मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाची घोषणा केली आहे. या मोहिमेतंर्गत राज्यातील सुमारे ९ कोटी ८६ लाख ४४ हजार ४१३ मतदारांच्या तपशिलाची प्रत्यक्ष घरसमान पडताळणी केली जाणार आहे. या मोहिमेवर महाविकास आघाडीने गंभीर आक्षेप घेतल्यानंतर, महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांनी पत्रकार परिषद घेऊन निवडणूक आयोगाची भूमिका स्पष्ट केली आहे. (पान ४ वर)

# मुंबईसह राज्याच्या अनेक भागात पावसाची हजेरी

मुंबई दि.२२ (प्रतिनिधी)- वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर एक दिलासादायक बातमी समोर आली आहे. राज्याच्या काही भागात पावसाने हजेरी लावली आहे. यामुळं नागरिकांना काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे. उकाड्याने हैराण झालेल्या पुणेकरांना दिलासा मिळाला आहे. त्याचबरोब मुंबई रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यात जोरदार पावसानं हजेरी लावली आहे. पावसानं हजेरी लावल्यामुळं तापमानाचा पारा काही प्रमाणात कमी झाला आहे.




उकाड्याने हैराण झालेल्या पुणेकरांना दिलासा मिळाला आहे. पुण्यात पावसानं हजेरी लावली आहे. पुण्यातील कोंढवा परिसरात ज्योती चौकात पावसानंतर रस्त्यावर पाणी भरलं आहे. नागरिकांना वाहने चालवताना त्रास होत आहे. या पावसामुळं वाहतूक संथ गतीनं सुरु आहे. काही दिवसांपासून पुणे शहरात तापमानाचा पारा ४० अंशाच्या पुढे गेल्याचा आपल्याला पाहायला मिळालं होतं. आज सकाळपासून मात्र शहरात ढगाळ वातावरणामुळे दुपारी पावसाला सुरुवात झाली. शहरातील उपनगर तसेच मध्यवर्ती भागात पावसाच्या सरी बरसू लागल्या आहेत. हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार पुढील दोन दिवस पुणे शहरात पावसाची शक्यता आहे. अचानक आलेल्या पावसामुळे निश्चित काही पुणेकरांची तारांबळ उडाली असली तरी सुद्धा उकाडापासून पुणेकरांना नक्कीच या पावसाने दिलासा दिला आहे.

मुंबईकर आतुरतेने मान्सूनच्या आगमनाची वाट पाहत होते. आज सकाळी मान्सूनपूर्व पावसाला सुरूवात झाल्यामुळे आल्हाददायक वातावरण निर्माण झाले आहे. हलक्या सरी का होईना, (पान ४ वर)

## तरुण आज ना उद्या रस्त्यावर उतरतील; विजय वडेट्टीवार यांचा सीजेपीवरून इशारा

मुंबई दि.२२ (प्रतिनिधी)- काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी सरकारने कॉक्रोच जनता पार्टीचे ट्विटर हँडल बॅन केल्याप्रकरणी सरकारवर निशाणा साधला आहे. तरुण रस्त्यावर उतरले तर आपली काय गती होईल अशी भीती सरकारला वाटत आहे. यामुळेच त्यांनी कॉक्रोच जनता पार्टीचे ट्विटर हँडल बॅन केले आहे किंवा रोखले आहे, असे ते म्हणालेत. दरम्यान, सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा मंत्री हसन मुश्रीफ यांनी ही देशातील पदवीधर व बेरोजगार तरुणांची मोहीम असल्याचे नमूद केले. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तरुणांच्या मनातील खदखद दूर करतील असा ठाम विश्वासही व्यक्त केला.

सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी काही दिवसांपूर्वी बेरोजगार तरुणांचा उल्लेख कॉक्रोच अर्थात झुरळ म्हणून केला होता. त्यानंतर अभिजीत दीपके या मराठी तरुणाने सोशल मीडियावर कॉक्रोच जनता पार्टी (सीजेपी) स्थापन केली आहे. या पार्टीच्या हँडलला मोठा प्रतिसाद मिळाला आहे. त्यामुळे सरकारने या पार्टीचे एक्स हँडल बंद केले आहे. या प्रकरणी तरुणांतून संमीश्र प्रतिक्रिया येत आहेत. या पार्श्वभूमीवर काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी सरकारवर उपरोक्त शब्दांत निशाणा साधला आहे.

देशातील तरुण वर्ग कॉक्रोच जनता पार्टीच्या माध्यमातून व्यवस्थेविरोधातील आपले मत व्यक्त करत आहे. त्यामुळे त्यांचे ट्विटर हँडल बॅन केले जाते किंवा थांबवले जाते. याचा अर्थ असा आहे की, सरकारच्या मनात भीती आहे. तरुण रस्त्यावर उतरला तर आपली काय गत होईल याची भीती सरकारला वाटत आहे. तरुण रस्त्यावर उतरणारच आहेत. आज ना उद्या हे होणारच आहे. त्यामुळे सरकार या देशातील तरुणांचा आवाज दाबू शकणार नाही असे वडेट्टीवार म्हणाले.

## अमेरिका-इराण युद्धाला अखेर पूर्णविराम मिळणार?; शांतता कराराचा अंतिम मसुदा तयार

वॉशिंग्टन दि.२२ (वृत्तसंस्था)- अमेरिका आणि इराण यांच्यातील शांतता कराराशी निगडीत संपूर्ण जगाला दिलासा देणारी अपडेट समोर आली आहे. ''अमेरिका-इराण यांच्यातील शांतता कराराचा अंतिम मसुदा तयार झाला असून, लवकरच याची घोषणा केली जाऊ शकते'', असे वृत्त अल अरेबिया या वृत्तसंस्थेने दिले आहे. पाकिस्तानच्या मध्यस्थीने हा मसुदा तयार करण्यात आल्याचे अल अरेबियाच्या वृत्तात म्हटले आहे.

अल अरेबियाने सूत्रांच्या हवाल्याने प्रसिद्ध केलेल्या वृत्तानुसार, दोन्ही देशातील करारात शस्त्रसंधीचा उल्लेख करण्यात आला आहे. तात्काळ प्रभावाने जमिनीवरील, समुद्रमार्गे आणि हवाईमार्गे युद्धविराम लागू करण्याचा आग्रह धरण्यात आला आहे. याशिवाय दोन्ही देशांकडून लष्करी तळ, नागरी वस्ती, पायाभूत आर्थिक सुविधा यावर हल्ले केले जाणार नाहीत याचाही करारात समावेश करण्यात आला आहे. प्रस्तावित मसुद्यात सार्वभौमत्व, प्रादेशिक अखंडता आणि अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप न करण्यावर भर देण्यात आला आहे. दरम्यान, या मसुद्यात इराण अण्वस्त्र कार्यक्रमाचा उल्लेख आहे की नाही? याबाबत माहिती समोर आलेली नाही.

या करारामुळे अरबी आखात, होर्मुझची सामुद्रधुनी आणि ओमानच्या आखातात सागरी वाहतुकीच्या स्वातंत्र्याची हमी मिळण्याचीही अपेक्षा आहे. या मसुद्यात कराराच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवण्यासाठी आणि दोन्ही देशांमधील वाद सोडवण्यासाठी एक संयुक्त समिती स्थापन करण्याचे प्रस्तावात म्हटले आहे. करार अंमलात आल्याच्या सात दिवसांच्या आत (पान ४ वर)

## आई-वडील दोघेही आयएएस अधिकारी, मग आरक्षण का हवे?-सर्वोच्च न्यायालय

नवी दिल्ली दि.२२ (वृत्तसंस्था)- सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी आरक्षण आणि सामाजिक स्थितीबाबत एक महत्त्वाची टिप्पणी केली. ज्यांनी शैक्षणिक आणि आर्थिक प्रगती साधलेली आहे. त्यांच्या कुटुंबांतून होणाऱ्या राखीव जागांच्या मागणीबाबत सर्वोच्च न्यायालयाने प्रश्न उपस्थित केला. ज्यांचे आई-वडील दोघेही आयएएस अधिकारी आहेत, त्यांना राखीव जागांची गरज काय? असा प्रश्न सर्वोच्च न्यायालयाने एका प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान उपस्थित केला. सर्वोच्च न्यायालयाच्या या टिप्पणीनंतर आरक्षणाची मर्यादा, क्रिमीलेयर या मुद्द्यांवर पुन्हा एकदा वाद उद्भवण्याची शक्यता आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या नायमूर्ती बीव्ही नागरत्ना आणि न्यायमूर्ती उज्ज्वल भुयान यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. सुनावणी दरम्यान न्यायमूर्ती नागरत्ना म्हणाल्या, ''जे लोक खरोखर मागास आणि वंचित आहेत, त्या समाजाच्या वर्गाला काही लाभ मिळावेत, या आरक्षणाचा खरा हेतू आहे. पण जेव्हा एखाद्या विद्यार्थ्याचे आई-वडील देशाच्या सर्वात मोठ्या प्रशासकीय सेवेत अधिकारी (पान ४ वर)

## इंधनाची साठेबाजी करू देऊ नका; मुख्यमंत्र्यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश

मुंबई दि.२२ (प्रतिनिधी)- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील सर्वच जिल्हाधिकाऱ्यांना इंधनाच्या साठेबाजीवर बारीक लक्ष ठेवण्याचे निर्देश दिले. सध्या काही ठिकाणी इंधनाअभावी तणावाची स्थिती निर्माण झाली आहे. पण ती सर्वदूर नाही. सरकारने या प्रकरणी सर्वच जिल्हाधिकाऱ्यांना पेट्रोल - डिझेल विशेषतः डिझेलच्या वाटपावर जातीने लक्ष घालण्याचे निर्देश दिलेत. सर्वांना गरजेनुसार डिझेल मिळावे असा सरकारचा प्रयत्न आहे, असे ते म्हणालेत. यावेळी त्यांनी अल निनोच्या पार्श्वभूमीवर सरकारचा प्लॅन तयार असल्याचेही स्पष्ट केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मुंबईतील जिओ वर्ल्ड सेंटर येथे आयोजित इमॅजिन नेक्स्ट-२०२६ या कार्यक्रमाला हजेरी लावली. त्यानंतर पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी आपण एआय तंत्रज्ञानाला टाळू शकत नसल्याचे स्पष्ट केले. ते म्हणाले, इमॅजिन नेक्स्ट हा एक अत्यंत महत्त्वाचा इव्हेंट येथे होत आहे. एआय व टेक्नॉलॉजीशी संबंधित लोकांना येथे निमंत्रित करण्यात आले होते. मी या कार्यक्रमाला एआयच्या अ‍ॅडोप्शन संदर्भात महाराष्ट्र काय करत आहे, याची माहिती दिली. कारण, आपल्याला माहिती आहे की, एआयची लाट आता कुणीही थांबवू शकत नाही. पण आपण त्या लाटेवर स्वार होऊन आपल्या सामाजिक व आर्थिक लढाईला गती देऊ शकतो. तोच प्रयत्न इंडिया एआय मिशनच्या माध्यमातून पंतप्रधान नरेंद्र मोदी करत आहेत. तोच प्रयत्न महाराष्ट्रात आपण करत आहोत. या प्रकरणी आपली रणनीती काय आहे हे आम्ही सांगण्याचा प्रयत्न केला.

महाराष्ट्राची अर्थव्यवस्था झपाट्याने वाढत आहे. सध्याचा आपला विकास दर पुढील २-३ वर्षे कायम ठेवला, तर आपण सिंगापूर व यूएईला मागे टाकू शकतो अशी स्थिती आहे. पंतप्रधानांचे जे मिशन आहे तेच आमचे मिशन आहे. तेच मिशन आम्ही महाराष्ट्रातही राबवत आहोत. कारण, सध्या देश जगाच्या अशा वळणावर उभा आहे की, आत्ता नाही तर कधीच नाही. आम्ही अशा विकासाच्या मार्गावर चालत आहोत. त्यामुळे २०४५ विकसित महाराष्ट्र व विकसित भारत बनेल.

## १० राज्यांमधील २४ राज्यसभा जागांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर

नवी दिल्ली दि.२२ (वृत्तसंस्था)- निवडणूक आयोगाने १० राज्यांमधील २४ राज्यसभा जागांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला. १८ जून रोजी निवडणूक होणार आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख ८ जून आहे. या जागांवरील विद्यमान सदस्य २१ जून ते १९ जुलै दरम्यान निवृत्त होत आहेत.निवृत्त होणाऱ्या सदस्यांमध्ये काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते दिग्विजय सिंह आणि माजी पंतप्रधान एच. डी. देवेगौडा यांच्यासह २४ खासदारांचा समावेश आहे.

आंध्र प्रदेश, गुजरात आणि कर्नाटक या राज्यांमध्ये प्रत्येकी चार जागांसाठी निवडणूक होणार आहे. मध्य प्रदेश आणि राजस्थानमध्ये प्रत्येकी तीन जागांसाठी मतदान होईल. झारखंडमध्येही तीन जागांसाठी निवडणुका होणार आहेत. तसेच मणिपूर, मेघालय, अरुणाचल प्रदेश आणि मिझोराम या राज्यांमध्ये प्रत्येकी एका राज्यसभा जागेसाठी मतदान होईल.

# आंतरवाली सराटीत लाड-जरांगेंत चर्चा; उपोषणावर ठाम

जालना दि.२२ (प्रतिनिधी)- मराठा आंदोलनाचा केंद्रबिंदू असणाऱ्या आंतरवाली सराटीत सध्या मराठा आंदोलक मनोज जरांगे व भाजप आमदार प्रसाद लाड यांच्यात चर्चा सुरू आहे. त्यात लाड यांनी जरांगे यांना त्यांचे ३० मेपासून सुरू होणारे संभाव्य आंदोलन मागे घेण्याचे आवाहन केले. त्यावर जरांगे यांनी सध्या तरी कोणतीही भूमिका स्पष्ट केली नाही. पण सरकारने मराठा समाजाला अद्याप सरसकट कुणबी प्रमाणपत्र का दिले नाही? असा सवाल करत लाड यांची कोंडी करण्याचा प्रयत्न केला. दरम्यान, प्रसाद लाड यांच्या आवाहनावर जरांगे कोणती भूमिका घेतात? याकडे अवघ्या राज्याचे लक्ष लागले आहे.

मनोज जरांगे यांनी येत्या ३० तारखेपासून आंतरवाली सराटीत उपोषण सुरू करण्याची घोषणा केली होती. तेव्हापासून पुन्हा एकदा राज्यात मराठा आरक्षणाचे रान पेटले आहे. जरांगेंनी दोन दिवसांपूर्वी नुकतीच प्रसाद लाड यांना भेटीचे निमंत्रण दिले होते. त्यानुसार लाड यांनी आज त्यांची आंतरवाली सराटीत जाऊन भेट घेतली. यावेळी उभय नेत्यांत प्रदिर्घ काळ चर्चा झाली. त्यात लाड यांनी जरांगे यांना सध्याचा उन्हाचा कडाका व शेतीच्या मशागतीची कामे पाहता त्यांचे आगामी उपोषण लांबणीवर टाकण्याचे आवाहन केले.

प्रसाद लाड म्हणाले, सध्या कडाक्याचे उन पडले आहे. तसेच खरीप हंगामाचीही कामेही सुरू आहेत. त्यामुळे माझे मनोज जरांगे यांना त्यांचे ३० मेपासून सुरू होणारे उपोषण लांबणीवर टाकण्याचे आवाहन आहे. सरकार आपल्या जागी आहे. मी मराठा समाजातर्फे त्यांना हे आवाहन करत आहे. मी गीतेतला सार घेऊन येथे आलो आहे. मुख्यमंत्री जातीचे नसतानाही त्यांनी मराठा समाजाला आरक्षण दिले. हा जरांगे यांचाच विजय आहे. आम्ही छत्रपती शिवाजी महाराजांना मानणारे कार्यकर्ते आहोत, असे ते म्हणाले.

प्रसाद लाड म्हणाले, माझे व मनोज जरांगे यांच्यात अनेकदा वाद झाले हे मला मान्य आहे. मराठा समाजाचा लढा १९८१ पासून सुरू झाला. जरांगे यांनी लढा दिला. त्यामुळे माझ्या समाजाला आरक्षण मिळाले. त्याविषयी मी जरांगे यांचे आभार मानतो. मी त्यांना विनंती केली की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना समजून घ्या. मागील ७० वर्षांत कोणत्याही मराठा नेत्याने केले नाही, असे काम फडणवीस यांनी केले आहे. जरांगेंनी ३० मेपासून आंदोलन करू नये. सध्या उन्हाचे दिवस आहेत. मी आमदार व नेता म्हणून येथे आलो नाही. सामान्य समाजाचा माणूस म्हणून मी येथे आलो आहे.

## 'कॉक्रोच जनता पार्टी'चे संस्थापक अभिजीत दीपके यांना जीवे मारण्याची धमकी!

नवी दिल्ली दि.२२ (वृत्तसंस्था)- 'कॉक्रोच जनता पार्टी' या अनोख्या आणि देशातील सर्वात मोठ्या डिजिटल राजकीय चळवळीचे संस्थापक अभिजीत दिपके यांना थेट जीवे मारण्याच्या धमक्या येत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. स्वतः अभिजीत दिपके यांनी सोशल मीडियावर आता मला जीवे मारण्याच्या धमक्या येत आहेत असे लिहीत या संदर्भातील माहिती शेअर केली आहे.

अभिजीत दिपके यांनी त्यांच्या पोस्टमध्ये आता मला जीवे मारण्याच्या धमक्या येत आहेत असे लिहीत त्यांना आलेल्या धमकीचा स्क्रीनशॉट किंवा माहिती शेअर केली आहे. गेल्या काही दिवसांत त्यांनी मांडलेल्या काही भूमिका किंवा पोस्टमुळे त्यांना लक्ष्य केले जात असल्याचे प्राथमिक दृष्ट्या समोर येत आहे.

या घटनेनंतर सोशल मीडियावरील त्यांच्या पाठीराख्यांनी आणि नेटिझन्सनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. वैचारिक मतभेदांमधून थेट जीवे मारण्याची धमकी देणे अत्यंत चिंताजनक असल्याचे युझर्सचे म्हणणे आहे. अनेक पत्रकारांनी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी या प्रकरणाची दखल घेण्याची मागणी केली आहे.

या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन संबंधित धमकी देणाऱ्या व्यक्तीविरोधात तातडीने सायबर पोलिसांत गुन्हा दाखल करावा आणि अभिजीत दिपके यांच्या सुरक्षेची काळजी घ्यावी, अशी मागणी नेटकऱ्यांकडून होत आहे. पोलीस या प्रकरणावर काय पाऊल उचलतात, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# शस्त्रांचा वापर आणि अमली पदार्थ...

आजकाल लहान मुले आणि तरुण पिढीमध्ये गुन्हेगारीची वाढती प्रवृत्ती, अवैध शस्त्रांची सहज उपलब्धता आणि अमली पदार्थांचे वाढते व्यसन ही एक गंभीर सामाजिक समस्या बनली आहे. या प्रश्नांची सखोल माहिती घेणे, त्यांची कारणे समजून घेणे आणि त्यावर प्रभावी उपाययोजना करणे अत्यंत गरजेचे आहे. तरी या लेखातून आपण यामागील कारणे, उपाययोजना यावर प्रकाश झोत टाकणार आहोत.

अवैध शस्त्रे मिळण्याचे स्रोत याचा विचार केला असता, स्थानिक पातळीवरील विक्रेते यासाठी खूप मोठं कारण आहे. अनेकदा 'गावठी पिस्तूल' किंवा स्थानिक पातळीवर बनवलेली शस्त्रे अल्पवयीन मुलांपर्यंत हे विक्रेते पोहोचवतात. हे विक्रेते गुप्तपणे कार्यरत असतात. गुन्हेगारी टोळ्या पण अशा प्रकारे शस्त्र पुरवण्यासाठी सक्रिय असतात. चोरी किंवा इतर मार्गांनी सुद्धा शस्त्रे मिळवली जातात अथवा इतर बेकायदेशीर मार्गांनी मिळवली जातात.

डार्क वेब किंवा काही विशिष्ट गुप्त ऑनलाइन प्लॅटफ फॉर्मवरूनही शस्त्रे मागवली जाण्याची शक्यता नाकारता येत नाही, जरी हे प्रमाण कमी असले तरी धोकादायक आहे. युवा पिढीचा सामाजिक माध्यमाचा चुकीच्या पद्धतीने वाढता वापर, विविध ॲप्लिकेशन, फ्लॅटफ फॉर्मचा वापर त्यांना अशा ऑनलाइन शस्त्र विक्री-खरेदीच्या जाळ्यात ओढण्यास कारणीभूत ठरतो. शक्ती प्रदर्शन आणि दहशत पसरवणे यासाठी अर्धवट बुद्धीची मुलं कुठलाच विचार करत नाहीत. शस्त्र बाळगल्याने इतरांवर प्रभाव पडतो, परिसरात दहशत निर्माण होते आणि स्वतःला शक्तिशाली समजण्याची भावना वाढते.

मित्रगटात स्वतःचे महत्त्व वाढवण्यासाठी किंवा टोळीत सामील होण्यासाठी, मोठ्या गुन्हेगारांनी आपल्याला जवळ करावे म्हणून सुद्धा काही नवोदित तरुण गुन्हेगार शस्त्रे बाळगतात. अनेकदा तरुण वयात परिणामांचा विचार न करता, केवळ तात्कालिक आवेशात किंवा चुकीच्या विचारसरणीच्या प्रभावाखाली येऊन शस्त्रे बाळगली जातात. असे करणे बेकायदेशीर आहे, समाजविघातक आहे याची जाणीव त्यांना नसते.

अमली पदार्थांचे तस्कर आणि स्थानिक विक्रेते अशा मुलांना आपलं हक्काचं गिऱ्हाईक बनवतात. हे तस्कर शाळा, कॉलेज आणि तरुणांच्या इतर गर्दीच्या ठिकाणी आपले जाळे पसरवतात. काही वेळेस डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय मिळणाऱ्या किंवा विशिष्ट प्रकारच्या रासायनिक घटकांचा समावेश असलेल्या औषधांचा (उदा. व्हाईटनरमधील ट्रायक्लोरोइथेन, आयोडेक्स, काही कफ सिरप) गैरवापर नशेसाठी केला जातो. प्रतिष्ठेचे खोटे प्रतीक म्हणून व्यसन करणे हा आजकाल ट्रेंड झाला आहे. तरुण अमली पदार्थांचे सेवन करणे हे फॅशन किंवा उच्चभ्रू समाजाचे लक्षण समजतात. सिनेमा, वेब सिरीज, व्हीडिओ किंवा सोशल मीडियावरील चुकीच्या चित्रणामुळेही हा गैरसमज पसरतो. अमली पदार्थांच्या माफियांकडून जाणीवपूर्वक व्यसन लावणे याचे प्रमाण देखील वाढलेले आहे. काही टोळ्या तरुणांना सुरुवातीला मोफत किंवा कमी किमतीत अमली पदार्थ देऊन त्यांना व्यसनाधीन बनवतात. एकदा नशेच्या आहारी गेल्यावर स्वतःवर नियंत्रण गमावाल्यावर आणि हातात शस्त्र असल्यावर ही अर्धवट वयाची पोर स्वतःला हिरो समजू लागतात. काहीवेळा स्वतःच्या मनात असलेली भीती किंवा असुरक्षिततेची भावना लपवण्यासाठी किंवा त्यावर मात करण्यासाठी तरुण शस्त्रे बाळगतात. आक्रमकता आणि राग ही सुद्धा मुलांना हत्यार वापरायला प्रेरित करतात. भावनिक अस्थिरता आणि मानसिक विकृती हा पण लक्षात घेण्यासाठी महत्त्वाचा मुद्दा आहे. काहीवेळा भावनिक अस्थिरता, मानसिक आजार किंवा व्यक्तिमत्त्व विकृती यांमुळे व्यक्ती हिंसक होऊ शकते आणि शस्त्रांचा वापर करू शकते.

बाल गुन्हेगारी, शस्त्रांचा वापर आणि अमली पदार्थांचे व्यसन या समस्यांवर नियंत्रण मिळवण्यासाठी व्यापक आणि बहुस्तरीय उपाययोजना करणे आवश्यक आहे. कौटुंबिक स्तरावर पालकांनी मुलांशी संवाद साधणे, मोकळा संवाद साधणे, त्यांच्या समस्या समजून घेणे आणि त्यांना योग्य मार्गदर्शन करणे महत्त्वाचे आहे. मुलांच्या सवयी, मित्र-संगत आणि त्यांच्या वागणुकीतील बदलांवर पालकांनी बारीक लक्ष ठेवणे गरजेचे आहे. शैक्षणिक स्तरावर जागरूकता कार्यक्रम राबवणे, शाळा आणि कॉलेजांमध्ये शस्त्रांचे आणि अमली पदार्थांचे दुष्परिणाम, कायदेशीर बाबी आणि मानसिक आरोग्याविषयी जागरूकता कार्यक्रम आयोजित करणे, सल्ला, मार्गदर्शन केंद्रे यांची मदत घेणे महत्वाचे आहे. सामाजिक संस्था आणि स्वयंसेवी संस्थांचा सहभाग यामध्ये मदत करू शकतो.

या क्षेत्रात काम करणाऱ्या सामाजिक आणि स्वयंसेवी संस्थांना प्रोत्साहन देऊन त्यांच्या माध्यमातून जनजागृती आणि व्यसनमुक्तीचे कार्यक्रम राबवणे गरजेचे आहे. कायदेशीर आणि प्रशासकीय स्तरावर बाल न्याय मंडळाची प्रभावी भूमिका आहे. बाल गुन्हेगारांच्या बाबतीत बाल न्याय मंडळाने संवेदनशीलतेने योग्य कारवाई करावी, जेणेकरून त्यांना सुधारण्याची संधी मिळेल. या समस्यांवर मात करण्यासाठी पालक, शिक्षक, समाज, शासन आणि स्वतः तरुण पिढी या सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे. योग्य वेळी योग्य हस्तक्षेप आणि मदतीमुळे अनेक तरुणांना चुकीच्या मार्गावर जाण्यापासून वाचवता येऊ शकते.

# काटकसर की नौटंकी ?

**दहा** मे रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी जागतिक संकटाला सामोरे जाण्यासाठी देशातील जनतेने काटकसर करावी, असे आवाहन केले. तेल आणि सोने आयातीमुळे देशावर परकीय चलनावर मोठा भार पडत असल्याचे सांगितले. खाजगी वाहनांचा वापर कमी करून सार्वजनिक वाहनांतून प्रवास करा असे म्हटले. मेट्रोतून प्रवास करा असा त्यांनी आवर्जून उल्लेख केला. वर्क फ्रॉम होम करा असा सल्ला दिला. वर्षभर सोने खरेदी करू नका आणि लग्न कार्यासाठी विदेशात जाऊ नका असेही जनतेला बजावले. डामडौल कमी करा, खर्च कमी करा, हे सांगणे अतियश योग्य आहे. पण जे लोक पैसे उधळतात, त्यांचे त्यांनी कान पकडायला हवेत. देशातील ऐंशी टक्के जनता दैनंदिन जीवनात व्यस्त आहे. मुंबईत ८० लाख लोक खचाखच गर्दीने भरलेल्या लोकलमधून प्रवास करतात ते काही मौजमजा म्हणून नव्हे. रोजचा दिवस सुखाचा जावा एवढीच साधी अपेक्षा जनतेची आहे. महागाईला तोंड देताना सर्वसामान्यांचे मासिक बजेट केव्हाच कोलमडले आहे. उधळपट्टी कोण करतयं , हे राज्यकर्त्यांना चांगले ठाऊक आहे. ज्यांच्याकडे भरपूर पैसा आहे, जे सत्तेच्या परिघात बागडत आहेत, ज्यांचा दैनंदिन खर्चसुध्दा उचलणारे दुसरेच कोणी आहेत, नियमानुसार होणाऱ्या कामाच्या फायलीवर स्वाक्षरी करण्यासाठी जे खंडणी वसुल करीत आहेत, त्यांना चाप लावणे सर्वात महत्वाचे आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी २०१४ मधे देशाच्या सर्वोच्च पदाची सूत्रे हाती घेतली तेव्हा सबका साथ सबका विकास या त्यांच्या घोषणेने देशातील जनतेवर भुरळ घातली होती. न खाऊंगा न खाने दूंगा, या घोषणेने आता लवकरच भ्रष्टाचार संपेल अशी आशा निर्माण झाली होती. केंद्रात एनडीए सरकारची ह'ट्ट्रीक झाली. पण गेल्या तेरा वर्षात भ्रष्टाचारात काहीच फरक पडला नाही. उलट प्रशासनात टक्केवारीचे दर दुप्पट- चौपट झाल्याची उघड चर्चा आहे. देशावर जागतिक संकट कोसळत असताना कोणीही भ्रष्टाचार करू नये, अशी ताकीद पंतप्रधान का देत नाहीत ? एक वर्षभर एक रूपयाही खाणार नाही व खाऊ देणार नाही अशी तंबी सत्तेच्या परिघातील नेत्यांना व त्यांच्या भोवती घुटमळणाऱ्या सग्या- सोयऱ्यांना का दिली जात नाही ? मंत्रालयात मंत्र्यांच्या पीएला लाच घेताना रंगेहात पकडले जाते याचा दुसरा अर्थ भ्रष्टाचार किती शिगेला पोचला असेल ? देशातील सर्व राज्यातील सर्व मंत्र्यांच्या मोटारीवरील लाल दिवे काढून घेतले तेव्हा मोदींच्या निर्णयाचे तमाम जनतेने मन:पूर्वक स्वागत केले. पण व्हीआयपी कल्चर बंद झाले नाही. सत्तेचा अंहकार कमी झाला नाही. भ्रष्टाचाराशिवाय कागद हालत नाही. मंत्री जनतेला मंत्रालयात भेटत नाहीत. जनता दरबार तर इतिहासजमा झाला. मंत्री स्वत: फोन घेत नाहीत. त्यांच्या पीए नामक सहाय्यकांचे फोनही डायव्हर्ट केलेले असतात. चहापेक्षा किटली गरम अशी प्रचिती सर्वत्र आहे. जर सत्तेच्या परिघातील लोकच वसुलीचे टार्गेट ठेऊन काम करीत असतील मग काटकसर कोणी करायची ?

मुख्यमंत्री व मुंबईचे पालकमंत्री मोटारबाईकवर बसून विधानभवनात आल्याचे राज्यातील जनतेने टीव्हीच्या पडद्यावर पाहिले. ती बाईक होती म्हणे पोलिसांची. बाईककडे पीयुसी झाले नव्हते. पण त्याचा इन्कारही कोणी केला नाही. बरोबर सुरक्षा कर्मचाऱ्यांचा ताफा घेऊनच फिरायचे मग काटकसरीचा देखावा कशाला ? एक उपमुख्यमंत्री महागड्या इलेक्ट्रीक मोटारीतून आले, त्यालाही प्रसिध्दी मिळाली. मुख्यमंत्री, मंत्री यांना मोटारींच्या ताफ्याची खरच गरज आहे काय ? गोव्याचे दिवंगत मुख्यमंत्री मनोहर पर्रिकरांसारखे आजच्या राज्यकर्त्यांनी स्कूटरवरून फिरावे, अशी कोणाची अपेक्षा नाही. पण एक दिवसासाठी बाईक वरून येण्याचा शो कशासाठी केला ? काही मंत्री कार्यालयात चालत जातानाचे फोटो प्रसिध्द झाले. काही नेते स्कूटरवरून तर काही सायकलवरून कार्यालयात पोचले. महापौर, सीईओंनी त्यांचेच अनुकरण केले. रोज तसे ते वागणार आहेत का ? फोटोशूट झाले, प्रसिध्दी झाली, हे लोकांना कळत नाही का ? पंतप्रधानांनी जनतेला काटकसरीचे आवाहन केले व सोमनाथ मंदिराच्या कार्यक्रमाला मोठा लवाजामा घेऊन पोचले. तेथे तर मोठा एअर शो झाला, इंधनाची केवढी उधळपट्टी झाली असेल. मध्य प्रदेशात सत्ताधारी पक्षाचे एक नेताजी आठशे मोटारींचा ताफा घेऊन उज्जैनवरून भोपाळला पोचले. पाठ्यपुस्तक मंडळाचे अध्यक्ष म्हणून त्यांची नेमणूक झाली, ( आपल्याकडचे बालभारती ). दुसरे नेताजी मोठा लवाजमा घेऊन भोपाळला पोचले त्यांची खादी ग्रामोद्योग मंडळाचे व तिसरे नेताजी असा ताफा घेऊन गेले , त्यांची लघुउदयोग महामंडळाच्या अध्यक्षपदावर नेमणूक झाली. नेमणुकीचे पत्र स्वीकारण्यासाठी मोठी उधळपट्टी करणारे हे नेते सुत्रे हाती घेतल्यावर काय दिवे लावणार आहेत याची कल्पनाच न केलेली बरी. जळगावमधे लोकप्रिय मंत्र्यांच्या वाढदिवसाला साठ- पासष्ट फूट उंचीचे कटआऊटस लागलेली दिसली. वाढदिवसाचे प्रदर्शन करू नका हे मंत्र्यांना कोण सांगणार ? एक केंद्रीयमंत्री बसमधून प्रवास करीत आहेत, असे फोटो प्रसिध्द झाले. ती बस खाजगी ट्रव्हल कंपनीची होती. मंत्री महोदयांच्या शेजारच्या आसनावरही कुणी बसलेले नव्हते. मात्र त्या बस मागे अधिकारी, सुरक्षा व्यवस्था, कार्यकर्ते अशा ४० मोटारींचा ताफा धावत होता. मंत्रिमहोदयांची ही काटकसर होती की फोटो शूट ? एकाच कार्यक्रमासाठी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व अनेक मंत्र्यांची गरज असते का ? उदघाटने, भूमिपुजने, हिरवा झेंडा दाखवणे असले कार्यक्रम ऑन लाईन घेता येणार नाहीत का ? शासकीय बैठकासुध्दा ऑनलाईन घेणे शक्य नाही का?

एनडीएची देशात २२ राज्यात सत्ता आहे. भाजपाचे १८ मुख्यमंत्री आहेत. निदान या राज्यात काटकसरीची कठोर अमलबजावणी होईल का ?

अमेरिका- इस्त्राएल- इराण युध्दामुळे महागाईचे मोठे संकट कोसळले असे सांगण्यात येत आहे. २८ फेब्रुवारी २०२६ रोजी इराणने होर्मूझ कालव्याची नाकेबंदी केली. तीच खरे भावी संकटाची चाहूल होती. तेव्हा केंद्रातील किंवा राज्यातील सत्ताधारी या विषयी ब्र काढत नव्हते. दोन महिने पाच राज्यातील निवडणुकांना प्राधान्य होते. दोनशे खासदार, दोन डझन केंद्रीयमंत्री, सतरा मुख्यमंत्री, पंतप्रधान, केंद्रीय गृहमंत्री, पाच राज्यात विशेषत: पश्चिम बंगालमधे तळ ठोकून बसले होते. विविध राज्यातील पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते हजारोंच्या संख्येने प्रचारात गुंतले होते. चार्टर्ड विमाने, हेलिकॉर्टर्स, हजारो मोटारी, साडेतीन लाख केंद्रीय सुरक्षा दलाचा फौज फाटा तैनात होता. निकाल लागले आणि भारतावर जागतिक संकट कोसळणार म्हणून पंतप्रधानांनी देशातील जनतेला सावध केले. पेट्रोल, डिझेल, सीएनजी दर वाढ झाली. देशभर सिलिंडरसाठी लोक वणवण फिरत होते तेव्हा डबल इंजिन सरकारचा घोष चालू होता. आता तर घरगुती व व्यावसायिक सिलिंडरचे भाव अवाक्याबाहेर गेले आहेत. पेट्रोल १२०- १३० पर्यंत जाईल व डिझेल शंभरी ओलांडेल. पेट्रोल- डिझेल नाही, असे फलक पंपांवर झळकत आहेत. वर्क फॉम होम ची टांगती तलवार आहे. खाजगी क्षेत्रात विशेषत: बहुराष्ट्रीय कंपन्यांमधे देशात लक्षावधी कर्मचाऱ्यांची गेल्या दोन महिन्यात कपात झाली आहे. अघोषित लॉकडाऊनसारखी परिस्थिती निर्माण होणार का ? जनतेला विश्वास व दिलासा हवा आहे.

**– डॉ. सुकृत खांडेकर**

# भारतीय प्रबोधनाचे जनक, राजाराम मोहनरॉय

**भारताला** थोर समाज सुधारकांची व राष्ट्र भक्तांची मोठी परंपरा लाभलेली आहे. या महात्म्यांनी समाजहितासाठी व राष्ट्र हितासाठी कार्य केलेले आहे. त्यांच्या या कार्याची दखल तत्कालीन परकीय शासनाने व विदेशातील देशांनीही घेऊन त्यांना गौरविलेले आहे. या थोर समाजसुधारकांनी समाजहितासाठी सर्वंकष प्रयत्न केल्याची साक्ष इतिहासात नमूद आहे. भारतीय जनतेचे प्रबोधन करून अनेक विधायक व रचनात्मक बाबी त्यांनी समाजात रूजविण्याचा प्रयत्न केलेला आहे.

अशा थोर समाज प्रबोधनकारात सर्वात वरचे नाव राजाराम मोहनरॉय यांचे आहे. बंगालमध्ये राहर्णाया समकांत आणि तारिपीदेवी यांना २२ मे १७७२ रोजी पुत्रलाभ झाला हे दोघेही कट्टर वैष्णव पंथी होते त्यांनी आपल्या मुलाचे नाव राममोहन ठेवले होते. राममोहनवर लहानपणापासूनच विधायक व चांगले विचार बिंबाविल्या गेले होते. बंगाली फारसीचे शिक्षण त्यांना देण्यात आले. त्यानंतर त्यांच्या वडिलांनी अरबी शिक्षणाची व्यवस्था केली. राममोहनने एका वर्षातच अरबी भाषा अवगत केली. पाटण्याला जावून तेथे त्यांनी फारशी, अरबी भाषा व साहित्य याचाच केवळ अभ्यास केला नाही तर इस्लामी इतिहास तत्वज्ञान आणि अध्यात्माचाही सखोल अभ्यास केला.. त्याचबरोबर युक्लिड व ऑरिस्टॉटल यांचे आणि यांच्यासंबंधी अरबीत उपलब्ध असलेले ग्रंथही वाचले. त्यांनी अनेक देशांचा दौराही केला. त्यांच्या या अभ्यासपूर्ण अध्ययन अध्यापनामुळे विचारांचे काहूर त्यांच्या डोक्यात थैमान घालू लागले. कधीच कुणी न पाहिलेल्या इश्वराच्या दगडी मूर्तीची पूजा लोक कशासाठी करतात? माणसामाणसात अमूक जातीतील माणसे मोठी शुध्द, पवित्र, श्रेष्ठ आणि इतर बाकींच्या जातीतील हलकी अपवित्र असा भेदभाव का? असे अनेक प्रश्न राममोहनला भेडसाऊ लागले. तत्कालीन हिंदुस्थानातील धर्म तत्वज्ञान आणि कायदा या विषयांचाही त्यांनी सखोल अभ्यास केला.

१८११ साली राममोहनचा थोरला भाऊ जगमोहन याचा मृत्यू झाला. त्या काळी बंगालमध्ये नर्वयाचा मृत्यू झाल्यावर त्याच्या पत्नीने त्याच्याच चित्तेवर त्याच्या प्रेताबरोबर स्वत:ला जाळून घ्यायचे आणि सती व्हायचे अशी भयंकर अमानुष चाल रूढ होती. जगमोहन यांच्या विधवा पत्नीला (अलोकमंजीरीला) चित्तेशी बांधण्यात आले विधी करणारे भटजी, पुरोहित मंत्र म्हणत होते. सहमरण/सहमरण/हाच विधवेचा खराधर्म. राममोहन हे सर्व पाहत होता त्याने वहिनीला असे न करण्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला पण व्यर्थ चितेला अग्नि दिला अलोमंजिरीच्या भयंकर किंकाळ्या कानी येवू लागल्या ती ओरडून सांगत होती. वाचवा मला वाचवा, सोडा तिला बाहेर काढा, राममोहन चवताळून म्हणाला परंतु त्याच्याकडे कुणीही लक्ष दिले नाही. या सती प्रकाराने राममोहन फारच अस्वस्थ बैचेन बनले होते. माणसाला जिवंत जाळणारा धर्म कसला? हे तर निव्वळ क्रौर्य आहे. खून आहे, त्याचे करूणामय मन आक्रंदन करून उठले. त्यांनी समाजातील या व अशा अनिष्ठ रूढी संपविण्यासाठी प्रयत्न करावयाचे ठरविले. अमानुष रूढी व परंपरा यांच्याविरूध्द मानवतेच्या जिव्हाळ्यानं आणि करूणेन मोठ्या शौर्यान बंड करून उठला. देशात दैन्य, दारिर्द्य, बेकारी, रोगराई, व्यसनाधीनता, आळस, अज्ञान या दुर्गुणांचे अरण्य मातलेले होते. अमानुष रूढी, परंपरा, अंधश्रध्दा, देवभोळेपणा, धार्मिक कार्यकांड, अस्पृश्यता, उच-नीच भेदभाव याचे सुध्दा रान माजलेले होते. सर्व बाजूंनी सामान्य माणसाचे दीन दलितांचे, भयंकर शोषण चाललेले होते. मानवी शरीर होते म्हणूनच त्यांना माणसे म्हणायचे नाही तर त्यांचे जीवन जनावरांसारखेच कनिष्ठ व हलाखीचे झालेले होते. अशा या अंधारयुगात हताश निराश झालेल्या देशवासीयांना आशेचा प्रकाश किरण ज्या व्यक्तीमुळे दिसू शकला ती व्यक्ती म्हणजे राममोहन रॉय होय.

राममोहनचा 'राजा राम मोहन रॉय' झाला- राममोहन यांनी परकीसत्तेविरूद्ध निकराची झुंज चालू होती. देशात भले ब्रिटीशांची कंपनी याची दडपशाही होती मात्र कोणीही त्यांच्या जुलमी प्रशासनाविरूद्ध आवाज उठवीत नव्हते. राजे, महाराजे, नवाब सरदार, जहांगीरदार होते मात्र तेही परक्या सरकारचे दास बनले होते. मांडलिक झाले होते. लाचार, स्तुतिपाठक व भाट बनले होते. मात्र राममोहन आपल्या देश बांधववार होर्णाया



अन्याय अत्याचाराविरूद्ध अनिष्ठ रूढी, परंपरा चालीरिती विरूद्ध आवाज उठवत होते. कंपनी सरकार दखल घेत नव्हते म्हणून लंडनला जावू ब्रिटीश नागरिक व पार्लमेंटचे सभासद यांच्या कानी हा भ्रष्ट कारभार कानी घालून न्याय मिळिवण्याचा विचार केला.

योगायोग असा की, त्यावेळी दिल्लीच्या तख्तावर अबूनसर हा मोगल सम्राट बादशाह म्हणून राज्य करीत होता त्याचा सुध्दा ब्रिटीश सत्तेशी काही प्रकरणावरून वाद चालू होता. त्यालाही या अन्यायाविषयी दाद मागावयाची होती. त्याला आपली बाजू मांडणारा व्यक्ती हवा होता. राममोहन विषयी त्याला माहिती मिळाली. मोगल सम्राटाने राममोहन यांना मोठ्या सन्मानाने दिल्लीला निमंत्रित केले. त्यांचा सत्कार केला व त्याचवेळी त्यांना 'राजा' हा किताब बहाल केला. राममोहन आज राजा राममोहनरॉय झाले. अशा प्रकारे १५ नोव्हेंबर १८३० रोजी राजा राममोहनरॉय इंग्लडला रवाना झाले. त्यांनी आपली मते प्रभावीपणे इंग्लड दरबारी मांडली.

**राजा राममोहन रॉयचे शैक्षणिक विचार –** तत्कालीन शिक्षण देण्याच्या पद्धतीबद्दल रॉय अतिशय नाराज होते. छडी लागे छम छम, विद्या येई घम घम या विरोधात होते. मारण्याऐवजी विद्यार्थ्यांना समजेल अशा भाषेत शिकवायला हवे. विद्यार्थ्यांच्या डोक्यात मारून कुटून काही कोंबण्याऐवजी त्यांना धडा किंवा पाठ किंवा प्रकरण व्यवस्थित समजावून सांगायला हवे. शिक्षक आणि विद्यार्थ्यांत नितांत प्रेम, स्नेह व आपुलकी हवी. असे त्यांना वाटायचे. दोनशे चाळीस वर्षापूर्वी हे शिक्षणाबाबतचे विचार समजून सांगणे अतिशय अवघड होते. आज मात्र राजामोहन रॉय यांची शिक्षण पद्धती भारत सरकारने स्वीकारली. गुणात्मक शिक्षण पद्धती, छडी विना शिक्षण, शिक्षक व विद्यार्थी यांची जवळीकता, शिक्षणातून मानव घडला पाहिजे हे विचार देशाने आज स्वीकारले आहे.

सती चालीच्या बंदीसाठी राजाराम मोहन रॉय यांचे प्रयत्नांना यश- अडीचशे वर्षांपूर्वी भारतात सतीची चाल सर्वत्र होती. बंगाल प्रांतात तर ती मोठ्या प्रमाणात होती. राजाराम मोहन रॉय यांनी या असामाजिक, अनिष्ठ प्रथेविरूद्ध आवाज उठविला. मृत नर्वयाच्या मागे त्याच्या विधवा पत्नीने स्वत:ला जाळून घेणे ही क्रौर्याची परिसीमा होती. धर्माच्या नावाखाली ही दुष्ट रूढी अज्ञानी चाल वर्षानुवर्षे चालू होती. बालपणापासून राजाराम मोहन रॉय महिलांचे अपमानीत आयुष्य पाहत आले होते. अनेक वरिष्ठ इंग्रज अधिकार्यांशी या प्रथेच्या बंदीबाबत त्यांनी चर्चा केली काहींना पटले. इंग्रज व्हाईसरॉय हेस्टिंग्ज यांचे मत याबाबत अनुकूल असले तरी या प्रथेविरूद्ध तो पाऊल उचलण्याचे धाडस करू शकत नव्हता. न्यायाच्या दृष्टिकोनातून पाहता सती हा स्त्रीवधच होता. लॉर्ड विल्यम बेटिंगचे मात्र योग्य पाऊल उचलून ४ डिसेंबर १९२९ रोजी भारतात सती बंदीचा कायदा केला मात्र याचे सर्व श्रेय राजाराम मोहनरॉय यांना जाते.

अमानुष रूढी व परंपरा विरूद्ध आवाज उठविणारा एकमेव देशभक्त व समाजभक्त – धर्माच्या नावाखाली चाललेल्या अधर्माविरूद्ध राजाराम मोहनरॉय माणसांचा वैफ्वार घेवून मोठ्या धैर्याने उभे राहिले. देवाच्या नावाने चालर्णाया लुबाडणुकीविरूद्ध आवाज उठवून लोक जागृती त्यासमयी निर्भयपणे केली.

अमानुष रूढी व परंपरा यांच्याविरूद्ध रॉय यांनी मानवतेच्या आणि करूणेच्या मोठ्या शौर्यान विरोध असतानाही बंड उभारले. इंग्रजांना दटावणारा आणि देशबंधूंना भ्रांत अवस्थेत समजावणार राजाराम मोहन रॉय हा पहिला भारतीय देशभक्त होता. असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. आपला देश आणि देशवासीयांचा उद्धार हे ध्येय साध्य त्यांच्या दृष्टी पुढून कधीही ढळले नव्हते. त्यांनी दोषाबद्दल इंग्रजी सत्तेलाच धारेवर धरले असे नाही तर स्वदेशातील अडाणी, स्वार्थी, धर्मान्धता, दुष्ट रूढी परंपरा इत्यादी दुर्गणाबद्दल देश बांधवानाही तेवढ्याच कठोरपणाने खडसावले होते. चुकीच्या समजुती दूर केल्या- या जन्मी मनुष्याने पाप केले तर त्याला पुनर्जन्म भोगावा लागतो. अशी समजूत सर्व सामान्य व सुशिक्षितांची ही होती ती त्यांनी आपल्या व्याख्यानातून दूर केली. इंग्रज लोकांचीही भ्रामक कल्पना दूर केली. इंग्रज लोकांच्या मनातही त्यांच्याविषयी आदर निर्माण झाला. राजाराम मोहन रॉय यांना विश्वमानव म्हणून गौरविले आहे. त्यांनी माणसा माणसात कधीही भेदभाव केला नाही. सत्ता माणसांना मोडते तर मानवता माणसांना जोडते असे विशाल विचार रॉय यांचे होते. त्यांच्या स्मृतींना कोटी कोटी प्रणाम...

**– धोंडिरामसिंह राजपूत**

# समाजसुधारणेचा दीपस्तंभ : राजा राममोहन रॉय

राजा राममोहन रॉय हे भारतीय पुनर्जागरणाचे अग्रदूत मानले जातात. आधुनिक भारताच्या सामाजिक, धार्मिक आणि शैक्षणिक सुधारणांचा पाया घालणाऱ्या या महान व्यक्तिमत्त्वाची जयंती म्हणजे समाजप्रबोधनाच्या कार्याची आठवण करून देणारा प्रेरणादायी दिवस होय.एकोणिसाव्या शतकात त्यांनी अतिशय प्रतिकूल परिस्थितीमध्ये समाज सुधारणांसाठी केलेले प्रयत्न,त्यासाठी उभारलेला सनदशीर लढा आणि कायद्याची मदत घेऊन केलेल्या समाजसुधारणा आजही प्रेरणादायी आहेत.

त्यांनी अठराव्या आणि एकोणिसाव्या शतकाच्या संक्रमणकाळात भारतीय समाजाला नव्या विचारांची दिशा दिली. त्यांच्या विचारांमुळे भारतीय समाजात आधुनिकतेची पहाट उगवली. राजा राममोहन रॉय यांचा जन्म २२ मे १७७२ रोजी बंगालमधील राधानगर येथे झाला. त्यांचे वडील रामकांत रॉय आणि आई तारिणी देवी हे धार्मिक वृत्तीचे होते. बालपणापासूनच त्यांना संस्कृत, फारसी, अरबी, बंगाली आणि इंग्रजी भाषांचे ज्ञान प्राप्त झाले. विविध धर्मग्रंथांचा त्यांनी सखोल अभ्यास केला. वेद, उपनिषदे, कुराण आणि बायबल यांचा तुलनात्मक अभ्यास करून त्यांनी मानवतेचा व्यापक दृष्टिकोन स्वीकारला.त्यांचा उत्कर्ष हा भारतातील सामाजिक आणि वैचारिक संक्रमणाच्या काळात झाला.

त्या काळात भारतात ईस्ट इंडिया कंपनीची सत्ता होती. इंग्रजांचे राजकीय वर्चस्व वाढत असताना भारतीय समाज मात्र अनेक अनिष्ट प्रथा, अंधश्रद्धा आणि कालबाह्य चालीरीतींमध्ये अडकलेला होता. स्त्रियांची स्थिती अत्यंत दयनीय होती. सतीप्रथा, बालविवाह, बहुपत्नीत्व, स्त्रीशिक्षणावरील बंदी, विधवांचा होणारा छळ, जातिभेद आणि अस्पृश्यता या सामाजिक विकृतींनी समाज पोखरला होता. धर्माच्या नावाखाली कर्मकांडांना अधिक महत्त्व आले होते. समाजात विवेकापेक्षा अंधश्रद्धेचे वर्चस्व वाढले होते.

अशा प्रतिकूल परिस्थितीत राजा राममोहन रॉय यांनी समाजसुधारणेचा ध्यास घेतला. त्यांनी स्त्रियांच्या हक्कांसाठी प्रभावीपणे आवाज उठवला. विशेषतः सतीप्रथेच्या विरोधातील त्यांचा लढा ऐतिहासिक मानला जातो. पतीच्या मृत्यूनंतर स्त्रीला जिवंत जाळण्याची अमानवी प्रथा त्यांनी मानवतेविरुद्धचा अपराध असल्याचे ठामपणे मांडले. त्यांनी अनेक लेख, पुस्तके आणि निवेदने लिहून समाजमत जागृत केले. इंग्रजी सत्ताधाऱ्यांशी पत्रव्यवहार करून त्यांनी सतीप्रथा बंद करण्याची मागणी सातत्याने केली. त्या काळचे गव्हर्नर जनरल लॉर्ड विल्यम बेन्टींक यांच्याशी त्यांनी संवाद साधला. त्यांच्या प्रयत्नांना यश येऊन १८२९ मध्ये सतीप्रथेवर बंदी घालणारा कायदा लागू करण्यात आला. हा भारतीय समाजसुधारणेच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा ठरला.

राजा राममोहन रॉय यांनी १८२८ मध्ये ङ्गब्राह्मो समाजङ्घ या संस्थेची स्थापना केली. या संस्थेच्या माध्यमातून एकेश्वरवाद, सामाजिक समता, स्त्री-पुरुष समानता आणि विवेकनिष्ठ विचार यांचा प्रचार करण्यात आला. त्यांनी मूर्तिपूजा, अंधश्रद्धा आणि अवास्तव कर्मकांडांना विरोध केला. धर्म म्हणजे मानवसेवा आणि नैतिकता हा संदेश त्यांनी दिला.

शिक्षण क्षेत्रातही त्यांचे योगदान मोठे आहे. त्यांनी आधुनिक शिक्षणाचा पुरस्कार केला. इंग्रजी शिक्षण, विज्ञान आणि गणित या विषयांच्या अभ्यासाला त्यांनी प्रोत्साहन दिले. भारतीय युवकांनी आधुनिक ज्ञान मिळवावे, असा त्यांचा आग्रह होता. त्यांनी हिंदू कॉलेज स्थापनेतही पुढाकार घेतला. बंगाली भाषेत अनेक ग्रंथ प्रकाशित करून त्यांनी समाजप्रबोधन केले.

संवाद कौमुदी आणि ङ्गमिरात-उल-अखबार यांसारख्या वृत्तपत्रांच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक प्रश्नांवर जनजागृती केली. भारतीय पत्रकारितेचे जनक म्हणूनही त्यांचा गौरव केला जातो.समाजसुधारणेच्या कार्यात त्यांना मोठा विरोध सहन करावा लागला. सनातनी मंडळींनी त्यांच्यावर टीका केली. धर्मविरोधी, परंपराविरोधी अशी त्यांची बदनामी करण्यात आली. काहींनी त्यांच्यावर सामाजिक बहिष्कार टाकण्याचाही प्रयत्न केला. मात्र त्यांनी विवेक, तर्क आणि मानवतेच्या आधारावर आपले कार्य अखंड सुरू ठेवले. समाजहितासाठी संघर्ष करण्याची त्यांची वृत्ती अत्यंत प्रेरणादायी होती.

राजा राममोहन रॉय यांनी इंग्लंडमधील सत्ताधाऱ्यांशी आणि विचारवंतांशीही पत्रव्यवहार केला. भारतीय समाजातील परिस्थिति, शिक्षणाची गरज आणि सुधारणांचे महत्त्व त्यांनी ब्रिटिश प्रशासनाला पटवून दिले. भारतात आधुनिक शिक्षणपद्धती सुरू व्हावी यासाठी त्यांनी प्रयत्न केले. त्यांनी पत्रकारितेच्या स्वातंत्र्याचाही पुरस्कार केला. प्रेसवरील निर्बंधांविरोधात त्यांनी आवाज उठवला.

सन १८३० मध्ये ते इंग्लंडला गेले. तेथे त्यांनी भारतीयांच्या प्रश्नांबाबत भूमिका मांडली. इंग्लंडमधील अनेक विद्वानांनी त्यांच्या विचारांचे स्वागत केले. २७ सप्टेंबर १८३३ रोजी ब्रिस्टलजवळील स्टेपलटन येथे त्यांचे निधन झाले. त्यांच्या मृत्यूने भारताने एक महान समाजसुधारक गमावला; मात्र त्यांनी पेटवलेला समाजप्रबोधनाचा दीप आजही तेवता आहे.

राजा राममोहन रॉय यांच्या विचारांचा प्रभाव भारतातील अनेक समाजसुधारकांवर पडला. महाराष्ट्रात महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, महर्षी धोंडो केशव कर्वे,भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांसारख्या अनेक समाजसुधारकांनी सामाजिक परिवर्तनाची चळवळ अधिक व्यापक केली.

महाराष्ट्र अशा सामाजिक सुधारणांच्या कायम पाठीशी राहिले आहे.राजा राममोहन रॉय यांच्या विविध चळवळीचे, उपक्रमाचे, समाजसुधारणांचे महाराष्ट्राला कायम आकर्षण राहिले असून महाराष्ट्रातील सामाजिक चळवळींना त्यांच्या कार्यकर्तृत्वाने प्रेरणा मिळाली आहे. आज महाराष्ट्र शासनही महिला सक्षमीकरण, शिक्षण आणि सामाजिक न्याय यासाठी विविध योजना राबवत आहे. महिला व बालविकास विभागामार्फत महिलांच्या सुरक्षिततेसाठी, स्वावलंबनासाठी आणि आरोग्यासाठी अनेक उपक्रम राबवले जात आहेत. मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन, महिला बचतगटांचे सक्षमीकरण, बालविवाह प्रतिबंध, महिला अत्याचार प्रतिबंध, तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी विविध कल्याणकारी योजना शासनाने स्वीकारल्या आहेत. ङ्गबेटी बचाओ, बेटी पढाओङ्घ, महिला स्वयंसहाय्यता गट, कौशल्य विकास कार्यक्रम, तसेच डिजिटल शिक्षण यांसारख्या उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक बदल घडवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. लाडकी बहीण योजनेच्या मार्फत महिलांच्या आर्थिक स्वावलंबनाचे व त्या माध्यमातून आर्थिक सुधारणांचे नवे दालन राज्य शासनाने उघडले आहे.

सामाजिक सुधारणा ही केवळ शासनाची जबाबदारी नसून समाजातील प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. राजा राममोहन रॉय यांनी दिलेला विवेक, समानता आणि मानवतेचा संदेश आजही तितकाच महत्त्वाचा आहे. अंधश्रद्धा, भेदभाव आणि अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा त्यांच्या जीवनातून मिळते. त्यांच्या जयंतीनिमित्त आपण सामाजिक समतेचा, स्त्री-सन्मानाचा आणि प्रबोधनाचा विचार पुढे नेण्याचा संकल्प केला पाहिजे. हेच त्यांना त्यांच्या जयंती दिनाला खरे अभिवादन ठरेल.

**– प्रवीण टाके, उपसंचालक,**
विभागीय माहिती कार्यालय,कोल्हापूर
९७०२८५८७७७

# लष्कराची ताकद वाढणार! BEL कडून RRP Defense ला मोठी ऑर्डर, लष्करासाठी अत्याधुनिक जर्मेनियम लेन्स बनवणार

मुंबई, दि. २२ (प्रतिनिधी)- भारताच्या संरक्षण क्षेत्रातील स्वदेशी तंत्रज्ञानाला आणखी बळ मिळणार आहे. प्रगत इलेक्ट्रो-ऑप्टिकल सिस्टीम्स आणि थर्मल इमेजिंग तंत्रज्ञान क्षेत्रात कार्यरत असलेल्या आरआरपी डिफेन्स (RRP Defense) या भारतीय कंपनीला भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेडकडून (BEL) सुमारे ३० कोटी रुपयांची मोठी ऑर्डर मिळाली आहे. या ऑर्डरअंतर्गत कंपनी अत्याधुनिक जर्मेनियम लेन्सची निर्मिती करणार असून त्यांचा वापर संरक्षण क्षेत्रातील थर्मल आणि इन्फ्रारेड प्रणालींमध्ये केला जाणार आहे.

ही ऑर्डर भारताच्या संरक्षण उत्पादन क्षेत्रातील 'मेक इन इंडिया' आणि 'आत्म निर्भर भारत' मोहिमेसाठी महत्त्वाची मानली जात आहे.आरआरपी डिफेन्स हीभारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेडच्या तांत्रिक गरजांनुसार विशेष जर्मेनियम लेन्स डिझाइन, इंजिनिअर आणि कस्टमाइज करणार आहे.

**जर्मेनियम लेन्सचे संरक्षण क्षेत्रात मोठे महत्त्व–** जर्मेनियम लेन्स या थर्मल इमेजिंग आणि इन्फ्रारेड सेन्सिंग सीस्टिम्समधील अत्यंत महत्त्वाच्या घटकांपैकी एक मानल्या जातात. सामान्य ऑप्टिकल काचांपेक्षा जर्मे नियम इन्फ्रारेड किरणे प्रभावीपणे ट्रान्समिट करते. त्यामुळे थर्मल कॅमेरे, सर्व्हेलन्स सीस्टिम्स, वेपन साइट्स, टार्गेट ॲक्विझिशन सीस्टिम्स आणि संरक्षण क्षेत्रातील अनेक इलेक्ट्रो-ऑप्टिकल प्लॅटफफॉर्ममध्ये या लेन्सचा वापर होतो.

विशेष म्हणजे कमी प्रकाश किंवा रात्रीच्या परिस्थितीत लक्ष्य शोधणे, अचूक निरीक्षण करणे आणि ऑपरेशनची कार्यक्षमता वाढवण्यात या लेन्स अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यामुळे त्यांना आधुनिक इलेक्ट्रो-ऑप्टिकल सिस्टीम्सचे हृदय असेही म्हटले जाते.

BEL कडून मिळालेली ही ऑर्डर म्हणजे RRP Defense च्या प्रगत इलेक्ट्रो-ऑप्टिक्स आणि प्रिसिजन ऑप्टिकल इंजिनिअरिंग क्षमतेची मोठी दाद आहे. जर्मेनियम लेन्स या थर्मल इमेजिंग सिस्टीम्ससाठी मिशन-क्रिटिकल घटक आहेत. भारत स्वदेशी संरक्षण तंत्रज्ञानाकडे वेगाने वाटचाल करत असताना जागतिक दर्जाचे इलेक्ट्रो-ऑप्टिकल सोल्यूशन्स भारतात विकसित करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, अशी माहिती आरआरपी डिफेन्सचे संस्थापक आणि अध्यक्ष राजेंद्र चोडणकर यांनी दिली आहे.

दरम्यान, अलीकडेच BEL आणि RRP Group यांच्यात सेमीकंडक्टर्स, इलेक्ट्रो-ऑप्टिक्स, ड्रोन आणि इतर अत्याधुनिक संरक्षण तंत्रज्ञान क्षेत्रात सहकार्य वाढवण्यासाठी सामंजस्य करार (MoU) करण्यात आला होता. या नव्या ऑर्डरमुळे दोन्ही कंपन्यांमधील धोरणात्मक भागीदारी आणखी मजबूत होणार असल्याचे मानले जात आहे.

नवी मुंबई मुख्यालय असलेला RRP Group हा सेमीकंडक्टर्स, संरक्षण आणि एरोस्पेस तंत्रज्ञान क्षेत्रातील एक महत्त्वाचा भारतीय समूह मानला जातो. RRP Electronics, RRP S4E Innovation, RRP Drones Innovation आणि RRP Defense अशा चार विशेष कंपन्यांद्वारे हा समूह कार्यरत आहे. थर्मल इमेजिंग, इलेक्ट्रो-ऑप्टिकल उपकरणे, ड्रोन सिस्टीम्स आणि सेमीकंडक्टर पॅकेजिंग क्षेत्रात कंपनीने मोठी गुंतवणूक केली आहे. भारताच्या संरक्षण स्वावलंबन म ोहिमेत RRP Defense पुढील पिढीच्या स्वदेशी संरक्षण उपाययोजनांसाठी महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

# भारतीय समाज प्रबोधन जनक; राजाराम मोहन रॉय यांना पालिका वाचनालयात अभिवादन



वैजापूर, दि. २२ (प्रतिनिधी) - भारतीय समाज प्रबोधनाचे जनक व थोर समाज सुधारक तसेच सतीची चाल बंदीचा कायदा लॉर्ड विल्यम बेंटिंग यांच्या माध्यमातून१८२९ साली पारीत करून घेण्यासाठी केलेले सर्वंकष प्रयत्न करणारे राजाराम मोहन रॉय यांच्या जयंती निमित्त येथील पालिका वाचनालयात शुक्रवार(ता,२२) रोजी वाचक वर्गने त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार टाकून अभिवादन केले. जेष्ठ वाचक ईश्वर शिंपी, पी.एन. क्षीरसागर, धोंडीरामसिंह राजपूत, स.ग्रंथालय संजय राजपूत यांनी प्रथम अभिवादन केले- धोंडीराम राजपूत यांनी राजाराम मोहन रॉय यांच्या कार्याची माहिती दिली. या प्रसंगी केशव क्षीरसागर, रवींद्र साळुंके, श्री. राजळे, अविनाश गडाख , बबन क्षीरसागर व वाचक उपस्थित होते. शेवटी एस.व्ही. राजपूत यांनी आभार मानले.

# मनपाच्या मिटमिटा विद्यालयाच्या दहावीच्या पहिल्या बॅचचे माजी विद्यार्थ्यांचे स्नेह मेळावा



छत्रपती संभाजीनगर, दि. २२ (प्रतिनिधी) - मनपा माध्यमिक विद्यालय मिटमिटा येथील इयत्ता दहावीतील २०१० -११ च्या बॅचचा माजी विद्यार्थिनींचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. ही बॅच म्हणजे छत्रपती संभाजी नगर महानगरपालिकेतील माध्यमिक विद्यालयाची मिटमिटा येथे २००८ मध्ये आठवीचा वर्ग तत्कालीन शाळेचे मुख्याध्यापक संजीव सोनार व तत्कालीन जिल्हाधिकारी विकास खारगे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु करण्यात आले होते.

झाली होती आणि त्याच विद्यालयाची पहिली माध्यमिक वर्गाची सुरुवात होती. या काळात इंडस प्रकल्पा अंतर्गत मिटमिटा व मुकुंदवाडी या दोन ठिकाणी इयत्ता ८वी वर्ग सुरू करण्यात आला.

यामध्ये मिटमिटा शाळेचे मुख्याध्यापक संजीव सोनार यांनी इ.८ वर्गाला शिकवण्यासाठी स्वखर्चाने अंकुश बडक यांची नियुक्ती केली होती. त्यासोबतच इतर विषयांना अध्यापन करण्यासाठी शाळेतील श्री. रजनी हिवाळे, डी. डी.देवरे सर, सुभाष पंडित सर लक्ष्मीकांत नन्नावरे सर यांची मदत घेण्यात आली होती व ही बॅच २०१० - ११ ला शंभर टक्के निकाल लागून पास झाली होती.

मिटमिटा गावातील मुलींना पुढील शिक्षणाची सोय नसल्याकारणाने या मुलींचे ७वी नंतरचे शिक्षण अधुरे राहून त्या मुली शाळाबाह्य होत असत . बऱ्याच मुलींचे लग्न सुद्धा लवकर केली जात होती. परंतु या माध्यमिक शाळेने गावातील मुलींची शिक्षणाची सोय करून दिली तीच बॅच आज १६ वर्षानंतर पुन्हा एकत्र आली सर्व एकत्र आल्यानंतर त्यांना अतिशय आनंद झाला व एकमेकांना बघून त्या भारावून गेल्या.

सर्व मुलींनी काल शिक्षकांसोबत भोजन केले खेळ खेळले. जुन्या आठवणी सांगितल्या गाणी गप्पागोष्टी करत शाळेतील आठवणींना उजाळा दिला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी योगिता वाकळे,शारदा क्षीरसागर, मंदा मुळे, या मुलींनी विशेष परिश्रम घेतले.

प्रसंगी मनपा शिक्षण विभागाचे प्रशासन अधिकारी संजीव सोनार, माजी मुख्याध्यापिका रजनी हिवाळे, डी. डी.देवरे , सुभाष पंडित , तडवी सर, तसेच अंकुश बडक व माजी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# कामात हलगर्जीपणा टाळा, मोदींचा मंत्र्यांना इशारा!

नवी दिल्ली, दि. २२ (वृत्तसंस्था) - पंतप्रधान नरेंद्र मोदी परदेश दौऱ्यावरून भारतात परतल्यानंतर लगेचच केंद्रीय मंत्रिमंडळाची महत्त्वाची बैठक पार पडली. जवळपास साडेचार तास चाललेल्या या बैठकीत मोदींनी सर्व मंत्रालयांना आणि विभागांना स्पष्ट शब्दांत कामाला वेग देण्याचे निर्देश दिले. उरलेल्या फाईली तातडीने पूर्ण करा, निर्णय प्रक्रियेत होणारा विलंब थांबवा आणि प्रत्येक योजना वेळेत जनतेपर्यंत पोहोचली पाहिजे, असा स्पष्ट संदेश त्यांनी मंत्र्यांना दिल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. त्यामुळे केंद्र सरकारकडून लवकरच काही मोठे निर्णय जाहीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

दिल्लीतील या बैठकीला संध्याकाळी पाच वाजता सुरुवात झाली होती आणि ती रात्री उशिरापर्यंत चालली. बैठकीत सरकारच्या विविध विभागांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. विशेषतः ज्या मंत्रालयांमध्ये कामांचा वेग मंदावलेला दिसून आला, त्या विभागांना तातडीने सुधारणा करण्याचे आदेश देण्यात आले. पंतप्रधान मोदींनी स्पष्ट केलं की, सरकारच्या योजना कागदांवर न राहता थेट लोकांपर्यंत वेळेत पोहोचल्या पाहिजेत. कामात हलगर्जीपणा अजिबात चालणार नाही. प्रत्येक मंत्र्याने स्वतःच्या विभागावर सातत्याने लक्ष ठेवून निर्णय प्रक्रियेला गती द्यावी, असंही त्यांनी बैठकीत सांगितल्याचं समजतं.

या बैठकीत एकूण नऊ महत्त्वाच्या विभागांचे प्रेझेंटेशन सादर करण्यात आले. कृषी, वन, कामगार, रस्ते वाहतूक, कॉर्पोरेट व्यवहार, परराष्ट्र, वाणिज्य आणि ऊर्जा या मंत्रालयांच्या कामांचा आढावा घेताना मोदींनी प्रशासन अधिक सुलभ आणि जलद करण्यावर भर दिला. फायली लवकर पूर्ण करा, अनावश्यक चकरा टाळा, कमी वेळेत जास्त काम होईल याकडे लक्ष द्या. प्रत्येक प्रक्रियेत सोपेपणा आणणं गरजेचं आहे, असे निर्देश त्यांनी दिले. तसेच २०४७ पर्यंत विकसित भारत हे केवळ घोषवाक्य नसून सरकारची मोठी बांधिलकी असल्याचं त्यांनी अधोरेखित केलं.

बैठकीदरम्यान मोदींनी मंत्र्यांना भविष्याचा विचार करून काम करण्याचं आवाहनही केलं. आता मागे वळून पाहण्याची वेळ नाही. २०१४ पासून सरकार सत्तेत आहे, पण आता २०२६ मध्ये आपण पुढे काय करू शकतो यावर लक्ष केंद्रित करणं महत्त्वाचं आहे. अनावश्यक वादात अडकू नका आणि आपल्या विभागाच्या कामगिरीवर लक्ष द्या, असं त्यांनी स्पष्टपणे सांगितलं. त्यामुळे आगामी काळात सरकारकडून प्रशासनात आणखी वेगवान निर्णय प्रक्रिया राबवली जाऊ शकते, अशी चर्चा राजकीय वतुर्ळात सुरू झाली आहे.

# पृथ्वीचा शेवटचा देश कोणता ? जिथे ४० मिनिटेच सूर्यास्त होतो !

**पृथ्वी** गोल आहे, अशा गोलाकार पृथ्वीचा शेवटचा देश कोणता? त्या देशाचं वेगळेपणं काय? हे जाणून घेणं महत्त्वाचं आहे. कारण प्रत्येक देश सुंदर असतो. जर हा देश पृथ्वीच्या शेवटचा देश असेल तर त्याचं सौंदर्य अधिकच खास असेल. नॉर्वे हा जगातील सर्वात शेवटचा देश आहे. हा देश पृथ्वीचा शेवट आहे. हे देशातील उत्तर पोल मध्ये आहे. नॉर्थ पोलची अशी जागा आहे जेथे पृथ्वी आपल्या अक्षावर फिरते. नॉर्वे हा देश सर्वात सुंदर आहे. येथे रात्र होत नाही. झालीच तरी ती फार छोटी असते. नॉर्थ नॉर्वेच्या हेवरफेस्ट सिटी मध्ये फक्त ४० मिनिटांसाठी सूर्यास्त होतो. यामुळे याला 'कंट्री ऑफ मिडनाइट सन' देखील म्हटलं जातं. नॉर्वे हा देश खूप थंड आहे. अनेक देशात उन्हाळ्यात ४५ ते ५० डिग्री तापमान असते. या देशात अक्षरशः बर्फ जमा होतो. यावेळी नॉर्वे मधील तापमान हे शून्य डिग्री असते. थंडीत हे तापमान उणे ४५ डिग्री असते. येथे पोहोचल्या नंतर एका वेगळ्याच जगाचा अनुभव येतो. उत्तर ध्रुव जवळ असल्यामुळे येथे इतर देशांप्रमाणे रात्र किंवा सकाळ होत नाही. येथे सहा महिने रात्र तर सहा महिने दिवस असतो. थंडीच्या दिवसात तर येथे सूर्य दिसणे कठीण होते. येथे कधी सूर्य मावळतच नाही. उन्हाळ्यात येथे रात्र होत नाही. ही जागा इतकी इंटरेस्टिंग आहे की, लोकं दूरून पाहायला येतात.

हे सर्व जाणून घेतल्यावर तुम्हाला नक्कीच नॉर्वे ला जावसं वाटेल. पण ए-६९ हायवे पृथ्वीच्या टोकाला नॉर्वेशी जोडतो. हा रस्ता अशा ठिकाणी संपतो जिथून पुढे जाता येत नाही, कारण जग इथेच संपते. या महामार्गावर जायचे असले तरी एकट्याने जाण्यास मनाई आहे. यासाठी एक ग्रुप तयार करावा लागतो आणि नंतर येथे जाण्यासाठी परवानगी घ्यावी लागते. या रस्त्यावर कोणत्याही व्यक्तीला एकट्याने जाण्यास किंवा एकट्याने वाहन चालविण्यास परवानगी नाही. येथे सर्वत्र बर्फ आहे, त्यामुळे एकट्याने प्रवास करताना हरवण्याची भीती आहे. या ठिकाणी सूर्यास्त आणि पोलार लाइट्स पाहणे मजेदार आहे. येथे म ासळीचा व्यापार होत असे, पण हळूहळू या देशाचा विकास झाला आणि पर्यटक येथे येऊ लागले. आता पर्यटकांना येथे राहण्यासाठी हॉटेल्स आणि रेस्टॉरंटची सोय करण्यात आली आहे.

**संकलन : मिलिंद पंडित, कल्याण**

# अर्थकारण महत्वाचे का?

**महात्मा** गांधी १९१५ ला आफ्रिकेतून परत भारतात आले. चम्पारण, बिहार चा सत्याग्रह झाला १९१७ साली. जमीनदारांनी निळीच्या उत्पादनाची सक्ती केल्यामुळे संघर्ष निर्माण झालेला. या सत्याग्रहाच्या मुळाशी आर्थिक प्रश्न होते. स्वदेशी चळवळ दीर्घकाळ वेगवेगळ्या स्वरुपात सुरु होती.१८५० ला दादाभाई नौरोजी पासून.

स्थानिक कापसाला इथेच बाजारपेठ मिळावी, कापसापासून सूतकताई आणि त्यापासून कापड बनवल तर स्थानिक हातमाग कारागिरांना काम मिळेल आणि भारतीयांना कमी किमतीत अंगावर घालायला कपडा मिळेल असा दोन्हीबाजुना फायदा म्हणून त्यांनी खादी,सूतकताई यांचा प्रसार केला.

स्वदेशीचा आणखी एक कोन असा होता कि भारतात येणार विदेशी कापड ब्रिटनमधून येत होत. भारतात स्वदेशीने त्याची बाजारपेठ मोडली. परिणामी ब्रिटनमध्ये कापड गिरणी धंदा तोट्यात जाऊ लागला. कामगारांना नियमितपणे पगार मिळेनात. हा स्थानिक ब्रिटीश जनतेचा असंतोष सरकारवर मोठा दबाव टाकू लागला. स्वदेशीच्या मुळाशी इथल्या जनतेचे आर्थिक प्रश्न होते. १९२५ला गुजरातेत पुरामुळे नुकसान आणि नापिकी झालेली.सरकारने नुकसानभरपाई देण लांब राहील, ब्रिटीश सरकारने शेतसारा थेट ३० टक्के वाढवला.त्याविरोधात १९२८ मध्ये बारडोली मध्ये आंदोलन आणि सत्याग्रह झाला.त्यातून सरदार पटेलांचे नेतृत्व पुढे आले. शेतसारा वाढला हा आर्थिक प्रश्न आंदोलनाच्या मुळाशी होता. स्वतःच्या अंगणात मीठ असले तरीही मीठ विकतच घ्यायचे आणि तेही सरकारकडूनच हा सरकारचा कायदा होता. मिठासारखी गोष्ट सुद्धा विकत घ्यावी लागणे आणि सगळ्याच गोष्टींवर अवास्तव करांचा बोजा असणे याविरोधात आंदोलन उभ राहील. १२ मार्च १९३० ते ६ एप्रिल १९३० या २४ दिवसात गांधीनी ३८४ किमी प्रवास करून साबरमती ते दांडी असा मार्च काढला. दांडी मार्च आणि मिठाचा सत्याग्रह यांच्या मुळाशी सरकारच्या करांचा म्हणजेच आर्थिक प्रश्न होता. लॉरी बेकर ( १९१७-२००७ ) हा ब्रिटीश वास्तुरचनाकार. भारतात चाळीसच्या दशकात आल्यावर गांधीना भेटला. गांधीनी त्याला ३० किलोमीटर परिघातील वस्तू वापरून घर बांधायला सांगितल.त्याने तिथून स्थानिक वस्तू, बांबू, मातीच्या विटा यांच्यापासून स्वस्त आणि पर्यावरणपूरक घर बांधायला सुरुवात केली. ३० किलोमीटर परिघातल्या वस्तू वापरताना त्यांच स्थानिक पातळीवर असलेल उत्पादन, त्यांना वापरण्याच कौशल्य असलेले स्थानिक कारागीर आणि मजूर यांना मिळणारा रोजगार आणि स्थानिक पैसा स्थानिक बाजारपेठेत राहणे हे सूत्र त्यामागे होते. या सगळ्या कालखंडात लोक गांधींच्या मागे उभे राहिले कारण नुसत्या फुकाच्या अस्मितांच्या गप्पा, इतिहासाचे दाखले आणि पूर्वजांच्या शौर्याच्या गोष्टी माणसांचे मनोरंजन करतील मात्र ब्रिटीश सत्तेविरोधात दीर्घकाळ लढा द्यायला माणसांना प्रेरणा त्यांच्या जगण्याच्या प्रश्नाच्या असतील तरच माणस विश्वास ठेवून एक होतील हे त्यामागच मर्म होत. सगळा खेळ ग्रामीण भारताच्या अर्थकारणाचा आणि अर्थशास्त्राचा होता. ब्रिटीशांची भारत हि उत्पन्न देणारी वसाहत होती. तिथून मिळणाऱ्या पैशाचा ओघ कमी झाला तर देश चालवण्याचा खर्च आणि उत्पन्न यांचा मेळ बसला नाही तर ओसाड गावची पाटीलकी कोण कशाला बळेच धरून ठेवेल ? यातल मर्म सध्याच्या काळातल्या सत्ताधारी समूहाला समजणे जेवढ आवश्यक आहे तेवढच सध्याच्या काळातल्या विरोधकांना समजणे अतिआवश्यक आहे. लोकांच्या जगण्याच्या, पोटाच्या आर्थिक प्रश्नांवर लढे उभारले जात नाहीत तोवर लोक रस्त्यावर येणार नाहीत.

# जगाचा रिमोट कंट्रोल आपल्या खिशात ठेवणाऱ्या ५ अमेरिकन कंपन्या: ज्यांच्याशिवाय उद्याचा सूर्य मावळणार नाही

**गुगलवर** दररोज ८.५ अब्ज वेळा सर्च केले जातात आणि हे सर्च थांबले तर जगातील १९१ देश एका क्षणात वैचारिक अंधारात जातील. ही केवळ आकडेवारी नाही, तर आधुनिक मानवी संस्कृतीचे या एका कंपनीवर असलेले परावलंबित्व आहे. आज आपण अशा युगात आहोत जिथे देश सीमांनी नाही, तर या पाच कंपन्यांच्या सर्व्हरने जोडलेले आहेत.

आपण सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत या कंपन्यांच्या विळख्यात असतो. यातील एकही कंपनी जर उद्या सकाळी बंद झाली, तर जागतिक अर्थव्यवस्थेचा डोलारा पत्त्याच्या बंगल्यासारखा कोसळू शकतो. तंत्रज्ञानाच्या या महासत्तांनी आपले जीवन इतके सोपे केले आहे की, आता त्यांच्याशिवाय जगणे अशक्य वाटते.

पाचव्या क्रमांकावर असलेल्या ॲमेझॉनचे उदाहरण घ्या. ५८ देशांमध्ये पसरलेले ३१० दशलक्ष सक्रिय ग्राहक केवळ खरेदीसाठी यावर अवलंबून नाहीत. या कंपनीची लॉजिस्टिक यंत्रणा इतकी अवाढव्य आहे की, ॲमेझॉन उद्या बंद पडल्यास जागतिक पुरवठा साखळी केवळ ७२ तासांत कोलमडून पडेल. आपल्या महाराष्ट्रातील एखाद्या छोट्या गावात बसलेला तरुण जेव्हा एखादी वस्तू ऑर्डर करतो, तेव्हा त्यामागे जगभरातील हजारो विमानांचे आणि जहाजांचे जाळे कार्यरत असते.

चौथ्या क्रमांकावर मायक्रोसॉफ्टचे साम्राज्य आहे. सध्या जगभरात ३.४ अब्ज उपकरणांवर विंडोज ऑपरेटिंग सिस्टम धावत आहे. १७८ देश त्यांच्या बँकिंग, संरक्षण आणि शिक्षण व्यवस्थेसाठी पूर्णपणे मायक्रोसॉफ्टवर अवलंबून आहेत. जर मायक्रोसॉफ्टने त्यांचे सर्व्हर बंद केले, तर जगातील निम्म्याहून अधिक कार्यालये आणि सरकारी यंत्रणा एका मिनिटात ठप्प होतील.

तिसऱ्या क्रमांकावर मेटा ही कंपनी येते, जिचे ३.९ अब्ज मासिक सक्रिय वापरकर्ते आहेत. फेसबुक, व्हॉट्सॲप आणि इंस्टाग्रामच्या माध्यमातून मेटाने मानवी संवादाचे आतापर्यंतचे सर्वात मोठे जाळे विणले आहे. व्हॉट्सॲपशिवाय आपला दिवस सुरू होत नाही, ही आजची सामाजिक वास्तविकता आहे. संवादाचे हे माध्यम नसले तर जगभरातील कौटुंबिक आणि व्यावसायिक संपर्क एका रात्रीत तुटून जातील.

दुसऱ्या क्रमांकावर असलेली एनव्हीडिया ही कंपनी आजच्या एआय क्रांतीचा खरा कणा आहे. जगातील प्रत्येक कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणाली एनव्हीडियाच्या चिप्सवर चालते. विश्लेषकांच्या मते, या एका कंपनीशिवाय आधुनिक जगाची उत्क्रांती रातोरात थांबेल. एनव्हीडियाने तयार केलेल्या चिप्स केवळ हार्डवेअर नसूनत्या भविष्यातील मानवी प्रगतीचे इंधन आहेत.

पहिल्या क्रमांकावर अर्थातच गुगल आहे. माहितीचा महासागर असलेल्या गुगलशिवाय आजच्या पिढीला स्वतःचे अस्तित्व शोधणेही कठीण जाईल. १९१ देशांमधील नागरिक माहितीसाठी, नकाशांसाठी आणि शिक्षणासाठी गुगलवर अवलंबून आहेत. गुगल बंद होणे म्हणजे जगाने आपले डोळे गमावण्यासारखे आहे.

या पाच कंपन्यांनी केवळ व्यवसाय केला नाही, तर त्यांनी आपली जीवनशैली बदलून टाकली आहे. या कंपन्या अमेरिकन असल्या तरी त्यांचा प्रभाव प्रत्येक भारतीयाच्या घराघरात पोहोचला आहे. आपल्या दैनंदिन गरजांसाठी आपण या डिजिटल महासत्तांवर इतके अवलंबून झालो आहोत की, आता मागे फिरण्याचा रस्ता उरलेला नाही. या कंपन्यांची ही मक्तेदारी आपल्याला सोयीची वाटते की ही भविष्यातील एका मोठ्या संकटाची नांदी आहे, याचा विचार करण्याची वेळ आता आली आहे. जर यातील एकही दुवा निखळला, तर आपण पुन्हा आदिम युगाकडे तर जाणार नाही ना?

# कौशल्य विकासासाठी महाराष्ट्र आणि दक्षिण कोरियामध्ये करार

## राज्यातील युवकांना मिळणार जागतिक दर्जाच्या संधी; मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत स्वाक्षऱ्या

मुंबई, दि. २१ (प्रतिनिधी)- महाराष्ट्रातील तरुण पिढीला जागतिक दर्जाचे तंत्रज्ञान आणि प्रगत कौशल्य प्रशिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी राज्य सरकारने गुरुवारी दक्षिण कोरियातील अग्रगण्य संस्थांसोबत तीन महत्त्वपूर्ण सामंजस्य करार केले. या करारांमुळे पायाभूत औद्योगिक कौशल्यांपासून ते उच्च-स्तरीय प्रगत कौशल्यांपर्यंतच्या प्रशिक्षणाला मोठी गती मिळणार असून, हे सहकार्य महाराष्ट्राच्या तरुणांसाठी जागतिक पातळीवर रोजगाराच्या नव्या संधींचे दालन उघडणारे ठरेल, असा विश्वास यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

सह्याद्री अतिथीगृहात गुरुवारी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागांतर्गत हा करार सोहळा मुख्यमंत्र्यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. याप्रसंगी बोलताना मुख्यमंत्री म्हणाले, 'भारताची जवळपास ६५ टक्के लोकसंख्या ही ३५ वर्षांखालील आहे. ही तरुण पिढी आणि त्यांची नाविन्यपूर्ण विचारसरणी आपली खरी ताकद आहे. या ऊर्जेचे 'मानवी संसाधनात' रूपांतर करणे हे आमचे मुख्य ध्येय आहे. महाराष्ट्र हे देशाचे ग्रोथ इंजिन असून राज्याची ६६० अब्ज डॉलर्सची अर्थव्यवस्था लवकरच १ ट्रिलियन डॉलर्सवर नेण्याचे आमचे उद्दिष्ट आहे. हे साध्य करण्यासाठी उद्योग क्षेत्राला सर्व स्तरांवर उत्तम कौशल्यांची गरज आहे. हे आंतरराष्ट्रीय कौशल्य करार कागदावर न राहता त्याचे प्रत्यक्ष कृतीत रूपांतर केले जाईल.'

**महाराष्ट्रात उभारणार 'लर्निंग फॅक्टरी' मॉडेल –** राज्य शासनाचे 'व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय' आणि दक्षिण कोरियाच्या 'कोरिया पॉलिटेक्निक्स' यांच्यातील करारानुसार कोरियातील प्रसिद्ध 'लर्निंग फॅक्टरी' धर्तीवर आधारित प्रगत प्रशिक्षण केंद्रे महाराष्ट्रात उभारली जातील. मार्च २०२७ ते जून २०२८ दरम्यान ही केंद्रे पूर्ण क्षमतेने कार्यान्वित होतील. यात अत्याधुनिक यंत्रसामग्रीद्वारे थेट उद्योगांच्या गरजेनुरूप विद्यार्थ्यांना तयार केले जाईल.महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्था आणि दक्षिण कोरियाच्या 'नॅशनल इन्स्टिट्यूट फॉर लाइफलाँग एज्युकेशन' यांच्यात झालेल्या करारानुसार राज्यासाठी 'लाइफलाँग लर्निंग पॉलिसी फ्रेमवर्क' तयार केले जाईल. बदलत्या तंत्रज्ञानानुसार कर्मचाऱ्यांना सतत अपस्किलिंग आणि रिस्किलिंग करता यावे, यासाठी डिजिटल प्लॅटफफॉर्म विकसित केला जाणार आहे. रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ आणि दक्षिण कोरियातील प्रतिष्ठित 'कैस्टा' संस्थेच्या दोन शाखांमध्ये करार झाला आहे. याअंतर्गत महाराष्ट्रातील निवडक प्राध्यापक व विद्यार्थ्यांना 'कैस्टा'मध्ये मास्टर्स आणि पीएच. डी. करण्याची संधी मिळेल. तसेच दोन्ही संस्था मिळून 'जॉइंट रिसर्च सेंटर ऑन ग्लोबल सस्टेनेबिलिटी'ची स्थापना करणार आहेत.

> "हे करार राज्यातील कौशल्य विकास यंत्रणेला नवी दिशा देणारे ठरतील. उद्योगांच्या गरजेनुसार तंत्रज्ञान-स्नेही मनुष्यबळ तयार करण्यासाठी शासन कटिबद्ध असून, या सहकार्यामुळे महाराष्ट्र कौशल्य आणि नाविन्यता क्षेत्रात देशात अग्रस्थान निर्माण करेल.
> **– मंगल प्रभात लोढा, कौशल्य विकास मंत्री**

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# वाळूज औद्योगिक क्षेत्रातील उद्योगांनी गुंठेवारी नियमित करून घ्यावी; विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर दि.२२ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या हद्दीतील नागरिकांना कमी दरात बेटरमेंट चार्जेस भरून गुंठेवारी नियमित करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली असून, वाळूज औद्योगिक परिसरातील उद्योजकांनीही त्यांच्या जमिनी व बांधकामे दिलेल्या मुदतीत नियमित करून घ्यावीत, असे आवाहन महानगर आयुक्त तथा विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी केले.




वाळूज येथील मराठवाडा असोसिएशन ऑफ स्मॉल स्केल इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चर कार्यालयात गुंठेवारी नियमितीकरण प्रक्रियेबाबत मार्गदर्शनपर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस महानगर नियोजनकार हर्षल बाविस्कर, सहआयुक्त अंजली धानोरकर, उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी साधना बांगर, जिल्हा उद्योग केंद्राच्या महाव्यवस्थापक करूणा खरात यांच्यासह उद्योजक उपस्थित होते.

यावेळी बोलताना जी. श्रीकांत म्हणाले की, वाळूज एमआयडीसी परिसरात मोठ्या प्रमाणावर विनापरवाना व अनधिकृत बांधकामे झाली असून, त्यामुळे परिसरातील पायाभूत सुविधांवर ताण वाढत आहे. छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेशाचा नियोजनबद्ध आणि शाश्वत विकास साधण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली विकास योजनांमध्ये आवश्यक फेरबदलांची प्रक्रिया गतिमान करण्यात येत आहे.

प्राधिकरणाच्या हद्दीत पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नियमबाह्य बांधकामांवर कारवाई करण्यात येणार असून, शासन नियमांनुसार ३१ डिसेंबर २०२० पूर्वीचीच विनापरवाना बांधकामे नियमित केली जाणार आहेत. त्यानंतरची बांधकामे अनधिकृत मानून हटविण्यात येतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

तसेच, गुंठेवारी नियमितीकरणाचे प्रमाणपत्र व बांधकाम परवाने नसल्यास बँकांनी गृहकर्ज मंजूर करू नये, असे निर्देश देण्यात आल्याचे सांगून भविष्यात अनधिकृत बांधकामे होणार नाहीत यासाठी उद्योजकांनी दक्षता घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले.

वाळूज परिसरातील उद्योगांनी शहराच्या औद्योगिक विकासात महत्त्वाची भूमिका बजावली असून, त्यामुळेच आज शहरात टोयोटासारखे उद्योग आले आहेत आणि छत्रपती संभाजीनगरला 'इलेक्ट्रिक व्हेईकल कॅपिटल' म्हणून ओळख मिळत आहे, असे सांगून त्यांनी उद्योग क्षेत्रातील अनियमितता दूर करून हा परिसर आदर्श औद्योगिक क्षेत्र म्हणून विकसित करण्यासाठी उद्योजकांनी नियमितीकरण प्रक्रियेला प्रतिसाद द्यावा, असे नमूद केले.

उद्योजकांच्या शंकांचे निरसन व अर्ज स्वीकृतीसाठी मसीआ कार्यालयात सीएमआरडीएच्या अधिकाऱ्यांमार्फत मार्गदर्शन सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले. तसेच, समाजकंटकांकडून त्रास होत असल्यास उद्योजकांनी केवळ संदेशाद्वारे तक्रार करावी, संबंधितांविरुद्ध कठोर कारवाई केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

प्राधिकरणामार्फत वाळूज औद्योगिक परिसर व ३६ गावांच्या झालर क्षेत्रासाठी नवीन पाणीपुरवठा योजना, कचरा व्यवस्थापन, फायर स्टेशन उभारणी आणि रस्ते विकासाची कामे लवकरच हाती घेतली जाणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

बैठकीत वर्ग-२ जमिनींचे वर्ग-१ मध्ये चुकीने रूपांतर, विनापरवाना हस्तांतरण अथवा विक्री झालेल्या जमिनींची प्रकरणेही गुंठेवारी नियमितीकरणात समाविष्ट करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले. या संदर्भात तहसीलदार व नायब तहसीलदारांकडून मार्गदर्शन उपलब्ध करून दिले जाणार आहे.

यावेळी अभय योजनेंतर्गत गुंठेवारी विकास नियमितीकरणासाठी शुल्क सवलतीची माहिती देण्यात आली. त्यानुसार १ मे २०२६ ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत बेटरमेंट चार्जेसवर केवळ १० टक्के शुल्क आकारले जाणार आहे. त्यानंतर १ ऑगस्ट २०२६ ते ३१ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत ५० टक्के शुल्क आकारले जाईल, तर १ नोव्हेंबर २०२६ पासून पूर्ण शुल्क आकारण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

# आदर्श आचारसंहितेतील प्रस्ताव छाननी समितीमार्फतच सादर करावेत

छत्रपती संभाजीनगर दि.२२ (प्रतिनिधी)- भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांनी १८ मे २०२६ रोजी प्रसिद्ध केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार महाराष्ट्र विधान परिषद स्थानिक प्राधिकारी मतदारसंघांच्या दैवार्षिक निवडणुकीची घोषणा करण्यात आली आहे.

या निवडणूक कार्यक्रमात छत्रपती संभाजीनगर विभागातील नांदेड, उस्मानाबाद-बीड-लातूर, परभणी-हिंगोली तसेच औरंगाबाद-जालना या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघांचा समावेश असून संबंधित मतदारसंघांमध्ये तात्काळ प्रभावाने आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. शासन परिपत्रकानुसार, आदर्श आचारसंहितेच्या कालावधीत एखाद्या प्रस्तावास मान्यता देणे अथवा कार्यवाही करण्याबाबत संबंधित विभाग अथवा कार्यालय आग्रही असल्यास, अशा प्रस्तावांबाबत मार्गदर्शन किंवा आचारसंहितेमधून सूट मिळण्यासाठीचे प्रस्ताव थेट भारत निवडणूक आयोग किंवा मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाकडे पाठवू नयेत. हे प्रस्ताव तपासणीसाठी महाराष्ट्र शासन मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली गठीत छाननी समितीमार्फतच सादर करावेत, असे निर्देश देण्यात आले आहेत. सदर सूचना सर्व अधिनस्त कार्यालय प्रमुखांच्या निदर्शनास आणून देऊन त्याची काटेकोर अंमलबजावणी करण्याबाबत दक्षता घ्यावी, असे आवाहन विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर प्रशासनाने केले आहे.

# छत्रपती संभाजीनगर शहरात 'बकरी ईद' निमित्त ३ ठिकाणी तात्पुरत्या कत्तलखान्यांस परवानगी

छत्रपती संभाजीनगर दि.२२ (प्रतिनिधी)- आगामी 'बकरी ईद' सणाच्या पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजीनगर शहरात केवळ शेळी, मेंढी व म्हैस वर्गीय जनावरांच्या कुर्बानीसाठी महानगरपालिकेने ३ ठिकाणी अधिकृत स्वरूपात कत्तलखाने चालवण्यास परवानगी दिली आहे. महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे यांनी महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ आणि महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायदा १९७६ अन्वये हे आदेश जारी केले आहेत.

सकाळी ८.०० ते दुपारी २.०० वाजेपर्यंत या अधिकृत कत्तलखान्यांमध्ये परवानगी असणार आहे. दिनांक २६मे २०२६ मंगळवार रोजी दाऊदपुरा येथील दाऊदी बोहरा जमात, अंजुमन-ए-सैफी, बोहरा कब्रिस्तान, दाऊदपुरा पाटीदार भवनच्या मागे, जालना रोड. दिनांक २८ मे गुरुवार रोजी पडेगाव येथील पडेगाव कत्तलखाना, मनपा आणि शहाबाजार येथील शहाबाजार कत्तलखाना, मनपा. या ठिकाणी परवानगी देण्यात आली आहे.

कोणत्याही नागरिकाने उघड्यावर किंवा प्रशासनाने ठरवून दिलेल्या अधिकृत कत्तलखान्याशिवाय इतर कोणत्याही ठिकाणी जनावरांची कत्तल करू नये. मांसाची वाहतूक कोणत्याही परिस्थितीत उघड्यावर किंवा उघड्या वाहनातून केली जाऊ नये, ती पूर्णपणे झाकलेली असणे बंधनकारक आहे.ही परवानगी जरी विशिष्ट सणापुरती आणि तात्पुरती असली, तरी नियमितपणे चालवल्या जाणाऱ्या कत्तलखान्यांचे सर्व नियम, अटी व शर्ती या ठिकाणी लागू राहतील.नियम तोडणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे आदेश मनपा आयुक्त यांनी जाहीर केले आहेत.नागरिकांनी सण शांततेत आणि नियमांचे पालन करून साजरा करावा, असे आवाहन महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे यांनी केले आहे.

## खरीप हंगामासाठी विभागीय भरारी पथक स्थापन; गैरव्यवहार करणाऱ्यांवर कडक कारवाईचा इशारा

छत्रपती संभाजीनगर दि.२२ (प्रतिनिधी)- खरीप हंगाम २०२६-२७ मध्ये शेतकऱ्यांना दर्जेदार कृषि निविष्ठा वेळेत आणि योग्य दरात उपलब्ध व्हाव्यात यासाठी कृषि विभाग यांच्या वतीने विभागीय स्तरावर भरारी पथकांची स्थापना करण्यात आली आहे.

छत्रपती संभाजीनगर विभागातील कृषि निविष्ठांचे वितरण, तपासणी आणि सनियंत्रण अधिक प्रभावीपणे करण्यासाठी जिल्हानिहाय पथके नियुक्त करण्यात आली आहेत. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यासाठी ए.एल. काळुशे, तंत्र अधिकारी (गुणनियंत्रण) यांची पथक प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली असून पी.ए. ताजणे, मोहिम अधिकारी जिल्हा परिषद, एच.एस. कातोरे, जिल्हा गुण नियंत्रण निरीक्षक आणि एस.जी. बंडगर, विभागीय गुणनियंत्रण निरीक्षक यांची सदस्य सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

जालना जिल्ह्यासाठी ए.एल. काळुशे यांची पथक प्रमुख, एन. डी. भदाणे आणि एम.के. काटे यांची सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तर बीड जिल्ह्यासाठी ए.एल. काळुशे यांच्या नेतृत्वाखाली एस.जी. गरांडे आणि व्ही.पी. भोसले यांची सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सर्व पथकांसाठी एस. जी. बंडगर हे सदस्य सचिव म्हणून काम पाहणार आहेत.

संपूर्ण विभागात चांगल्या प्रतीच्या कृषि निविष्ठांचे व्यवस्थित वितरण होण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी प्रभावी नियोजन करावे, तसेच शेतकऱ्यांची कोणतीही अडवणूक होणार नाही याची दक्षता घ्यावी, अशा सूचना विभागीय कृषि सहसंचालक सुनिल वानखेडे यांनी दिल्या आहेत.

कृषि निविष्ठांच्या विक्रीमध्ये गैरव्यवहार, साठेबाजी किंवा जादा दराने विक्री आढळल्यास संबंधित उत्पादक अथवा विक्रेत्यांचे परवाने निलंबित अथवा रद्द करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात येणार असून गंभीर प्रकरणांमध्ये फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येतील, असा इशाराही कृषि विभागाने दिला आहे.

# निवासी अतिक्रमणांचे नियमानुकूलन; महसूल कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण

छत्रपती संभाजीनगर दि.२२ (प्रतिनिधी)- महसूल विभागाने घेतलेल्या लोकाभिमुख निर्णयानुसार निवासी अतिक्रमणे नियमित करण्यात (नियमानुकूल) येणार आहेत. दि.३१ डिसेंबर २०२६ पर्यंत ही कार्यवाही अभियान स्वरुपात राबविली जाणार आहे. जिल्ह्यात ही कार्यवाही करण्याच्या दृष्टीने आज जिल्हाधिकारी कार्यालयात महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक घेऊन त्यांना मार्गदर्शन करण्यात आले.






जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात आयोजीत या प्रशिक्षणात सर्व उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, नायब तहसिलदार, तसेच जमीन मोजणी कर्मचारी, नगरपालिकांचे मुख्याधिकारी आदी सहभागी झाले. अपर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकुणे, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, उपजिल्हाधिकारी (सामान्य शाखा) संगिता राठोड, जिल्हा खनिकर्म अधिकारी दिनेश झांपले, सह आयुक्त नगरपालिका सौरभ जोशी, सहा. आयुक्त ऋषिकेश भालेराव आदी उपस्थित होते.

अधिकारी कर्मचाऱ्यांना माहिती देण्यात आली की, निवासी अतिक्रमणे नियमानुकूल करण्यासाठी दि.१ जानेवारी २०११ रोजी किंवा त्यापूर्वी झालेले आणि सध्या अस्तित्वात असलले अतिक्रमण हा निकष आहे. हे अभियान केवळ निवासी अतिक्रमणांपुरतेच आहे. अर्जदार हा भारताचा नागरिक असणे आवश्यक आहे. यासाठी २०११ पूर्वीचा मतदार यादीतील नाव, वीज बिल, मालमत्ता कर पावती, ग्रामपंचायत ८ अ उतारा, अतिक्रमण सर्व्हेक्षण नोंदवही किंवा उपग्रह छायाचित्र, किमान १ वर्षातील रहिवासाचा एक शासकीय पुरावा आणि स्वयंघोषणा पत्र अशा कागदपत्रांसह अर्ज करणे आवश्यक आहे. या उपक्रमातून सार्वजनिक उपयोगाच्या उदा. शाळा रुग्णालये, खेळाची मैदाने, स्मशानभुमी, निस्तार हक्काच्या जमिती, पायाभुत सुविधांच्या जमिनी, आणी पर्यावरणीय क्षेत्रे उदा. वने, सीआरझेड, एनडीझेड, वेड लॅंड्स, पूररेषा दरडग्रस्त क्षेत्रे, गायरान जमिनी इ. प्रयोजनांच्या जमिनींना वगळ्यात आले आहे.

निवासी अतिक्रमणे नियमानुकूल करतांना मालकी हक्कासाठी भोगटदार वर्ग २ म्हणून जमीन हक्क मिळेल. पाच वर्षानंतर कायदेशीर प्रक्रियेने भोगवटदार वर्ग १ मध्ये रुपांतरण शक्य होईल. आदेशाच्या तारखेपासून पुढे पाच वर्षे जमीन हस्तांतरणास (विक्री, भाड्याने देणे, हस्तांतरीत करणे इ.) मनाई असेल. राज्यात केवळ एकाच जागेचा लाभ लाभार्थ्यांना मिळेल व जमिनीचा सातबारा किंवा मालमत्ता पत्रक पतिपत्नी यांच्या नावाने (संयुक्त) दिले जाईल. या प्रक्रियेत क्षेत्रमर्यादेचेही प्रयोजन ठेवण्यात आले आहे. त्यात ५०० चौरस फुटापर्यंतचे निवासी अतिक्रमणे विनामूल्य नियमानुकूल केले जातील. ५०१ ते १५०० चौरफुट क्षेत्रासाठी प्रचलित बाजारमुल्याच्या १० टक्के रक्कम अदा करावी लागेल. व्यावसायिक वापर असल्यास २५ टक्के शुल्क भरावे लागेल. तर १५०० चौरस फुटापेक्षा जासत अतिक्रमण असल्यास त्याचा अतिरिक्त भाग हा नियमित होणार नाही. अर्ज दाखल करुन त्याची मोजणी भुमि अभिलेख विभागामार्फत विनामूल्य करावयाची आहे. अर्ज केल्यापासून ९० दिवसांच्या आत निर्णय घेणे बंधनकारक आहे. ही सर्व प्रक्रिया ३१ डिसेंबर पर्यंत ही प्रक्रिया पूर्ण करावयाची आहे. त्यानंतर मार्ग अपात्र व अर्ज न करणाऱ्या व्यक्तिंची अतिक्रमणे धडक मोहीम राबवून निष्काषित केले जातील. या मोहिमेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांनी मनपा हद्दीत वार्ड ऑफिसर, नगरपालिका/नगरपंचायत क्षेत्रात मुख्याधिकारी, ग्रामिण भागात ग्रामसेवक यांच्याकडे अर्ज करावा. याबाबत निर्णय घेण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती तयार करण्यात आली आहे. या समितीमार्फत निर्णय घेण्यात येईल,अशी माहिती यावेळी देण्यात आली. सर्व संबंधित यंत्रणांनी कालमर्यादेचे भान राखून आपले कामकाज पूर्ण करावे,असे निर्देश अपर जिल्हाधिकारी अडकुणे यांनी दिले.

## नीट पेपर लीक प्रकरणात पुण्यातून मनीषा हवालदारला सीबीआयच्या बेड्या

पुणे दि.२२ (प्रतिनिधी)- देशभर गाजत असलेल्या नीट यूजी पेपरफुटी प्रकरणात आणखी एक धक्कादायक बाब समोर आली आहे. नीट पेपर लीक प्रकरणात आणखी एका मास्टरमाईंडला अटक करण्यात आली आहे. फिजिक्स म्हणजेच भौतिकशास्त्राचे प्रश्न लीक करणाऱ्या मनीषा संजय हवालदार नावाच्या महिलेला अटक करण्यात आली आहे. मनीषाने हवालदार या महिलेनं नीट यूजी परीक्षेतील भौतिकशास्त्राचे प्रश्न लीक केले होते.

मनीषा हवालदार सध्या पुण्यातील सेठ हिरालाल सर्फ प्रशाला येथे कार्यरत होती. सीबीआयने तिला पुण्यातून अटक केली आहे. एनटीएने तिला पेपर प्रक्रियेसाठी तज्ज्ञ म्हणून नियुक्त केले होते. तिच्याकडे भौतिकशास्त्राच्या प्रश्नपत्रिकांपर्यंत पोहोचू शकत होती. यापूर्वी अटक झालेल्या मनीषा मांढरेसोबत मिळून तिने भौतिकशास्त्राचे काही प्रश्न लीक केले होते. हे सर्व प्रश्न तपासण्यात आले आणि हेच लीक झालेले प्रश्न नीटच्या पेपरमध्ये आल्याचे आढळले.

# आंब्याची ब्रॅण्डिंग करून स्वत: विक्री किंवा निर्यात करावी-डॉ भगवानराव कापसे

छत्रपती संभाजीनगर दि.२२ (प्रतिनिधी)- नुकताच आंबा उत्पादक शेतकऱ्यांसाठी ब्रँड तयार करून मार्केटिंग करणे तसेच डायरेक्ट निर्यात दारास माल देणे याविषयी सविस्तर असा महा केशर आंबा बागातदार संघातर्फे वेबिनार आयोजित केला होता.

डॉ.भगवानराव कापसे यांनी आंब्याच्या मशागतीसाठी खत पाणी देण्यासाठी वर्षभर शेतकरी जिवाचे रान करून मेहनत करतात. मात्र आंबा तयार झाल्यानंतर शेतकरी फक्त व्यापाऱ्याचीच वाट पाहतात म्हणजे विक्री करतात पण करत नाही. स्वतः मार्केटिंग केली त्यासाठी मुंबई पुणे येथील सोसायटीमध्ये अंबा पिकून डायरेक्ट ग्राहकास दिल्यास अतिशय चांगले आर्थिक उत्पादन मिळू शकते हे त्यांनी काही शेतकऱ्यांची उदाहरण देऊन पटवून दिले. त्याचबरोबर त्यांनी रायपनिंग चेंबर सारख्या महागड्या पद्धतीने तसेच घरी सुद्धा अतिशय शास्त्रीय पद्धतीने आंबा कसा पिकवता येऊ शकतो याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले.

त्याचबरोबर आता काढणे संपत आली आहे तर अशा भागामध्ये पुढील वर्षी साठी करावयाची कामे त्यात छाटणी खते देणे बोर्डो पेस्ट लावणे इत्यादी बाबत सुद्धा सविस्तर विवेचन केले. यावर्षी नवीन लागवड करू इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांसाठी जमिनीची निवड अति घन लागवड पद्धत कलमाची निवड इत्यादी बाबत सविस्तर माहिती दिली तसेच शेतकऱ्यांच्या प्रश्नांना संयुक्तिक उत्तरे दिली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक महा केसर आंबा बागायतदार संघाचे सचिव विश्वनाथ दहे यांनी केले तर समारोप महा केसर आंबा बागायतदार संघाचे अध्यक्ष नंदू अण्णा काळे यांनी केला. कार्यक्रमाचे संचालन डॉ.शिवाजीराव उगले यांनी केले. या वेबिनार मध्ये विशेषतः आंबा काढणी, घरगुती पद्धतीने पिकवणे, पॅकिंग पद्धत, अंबा विक्री व्यवस्थापन, सोशल मीडियाचा वापर, आंबा महोत्सवाचे महत्व सविस्तर सांगण्यात आले.

या वेबिनार मध्ये विशेषत: ओंकार कुलकर्णी बीड, चंद्रकांत चव्हाण तासगाव जिल्हा सांगली महेश दारुंटे नाथ सीड फार्म मॅनेजर यांनी आपण आंबा पिकवून स्वतः लोकल तसेच पुणे मुंबई सारख्या शहरात विकत असल्यामुळे कसा मोठ्या प्रमाणात आर्थिक फायदा झाला हे विशद केले.

## शेतकऱ्यांसाठी तक्रार निवारण कक्षाची स्थापना

छत्रपती संभाजीनगर दि.२२ (प्रतिनिधी)- कृषि विभागाच्या आयुक्तालय स्तरावर कृषि निविष्ठांच्या गुणवत्ता व पुरवठ्याच्या अनुषंगाने खरीप हंगामात शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणीचे तात्काळ निराकरण करण्यासाठी विभाग स्तरावर तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. या कक्षाचा संपर्क भ्रमणध्वनी क्रमांक ९४२१२३३२७० तसेच कृषि आयुक्तालय पुणे यांच्या टोल फ्री क्रमांक १८००२३३४००० असा आहे. वरीलप्रमाणे संपर्क क्रमांकावर शेतकऱ्यांनी निविष्ठांच्या उपलब्धते बाबत तसेच अडचणी, तक्रारी बाबत संपर्क करावा व अडचणी तक्रारीचे निराकरण करण्यात यावे असे आवाहन विभागीय कृषि सहसंचालक छत्रपती संभाजीनगर सुनिल वानखेडे यांनी केले आहे.

# भारतीय सैन्य भरती ऑनलाईन सामायिक प्रवेश परीक्षेचे आयोजन

छत्रपती संभाजीनगर, दि.२२ (जिमाका) भारतीय सैन्य भरती वर्ष २०२६-२७ अंतर्गत ऑनलाईन सामायिक प्रवेश परीक्षा' दि. १ जून ते १२ जून २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे. ही सामायिक प्रवेश परीक्षा पूर्णपणे 'संगणक आधारित परीक्षा' असेल. देशभरातील २०६ शहरांमधील ४०३ परीक्षा केंद्रांवर परीक्षा घेतली जाणार असून, यामध्ये एकूण २२ प्रवर्गांचा समावेश आहे.

उमेदवारांना परीक्षेचे वेळापत्रक, पात्रता, निकष आणि प्रवेशपत्र डाउनलोड करण्यासाठी www.joinindianarmy.nic.in या अधिकृत संकेतस्थळाला नियमित भेट द्यावी.

सैन्य भरती पूर्णपणे गुणवत्तेच्या आधारावर केली जाते. त्यामुळे उमेदवारांनी कोणत्याही चुकीच्या मार्गांचा अवलंब करू नये किंवा फसवणूक करणाऱ्या एजंट्सना बळी पडू नये, उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रांसह दिलेल्या वेळेत परीक्षा केंद्रावर हजर राहणे बंधनकारक आहे.

'देशाची सेवा करण्याची ही एक सुवर्णसंधी आहे. पात्र तरुणांनी या भरती प्रक्रियेत उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे,' असे आवाहन आर्मी रिक्रूटमेंट ऑर्गनायझेशनतर्फे आले आहे.

(पान १ वरुन)

## महाराष्ट्रात मतदार याद्यांची मॅपिंग सुरु

एस. चोकलिंगम यांनी सांगितले की, ही प्रक्रिया अत्यंत पारदर्शक पद्धतीने राबवली जात असून कोणत्याही पात्र मतदाराचे नाव यादीतून विनाकारण वगळले जाणार नाही. या कामासाठी राज्यात तब्बल १ लाख २५३ बूथ लेव्हल ऑफिसर्स नियुक्त करण्यात आले आहेत. जनगणनेचे काम संपल्यावर लगेचच या मोहिमेला प्रत्यक्ष सुरुवात होणार आहे.

## मुंबईसह राज्याच्या अनेक भागात...

पण या पावसामुळे नागरिकांना उकाड्यापासून दिलासा मिळाला आहे.

पिंपरी चिंचवडमध्ये दुपारी चार वाजण्याच्या सुमारास अंधारमय वातावरण झालं आहे. तुफान पाऊसही झाला आहे. उकाड्याने हैराण झालेले शहरवासीय पावसाची आतुरतेने वाट पाहत होते. अखेर आज ही प्रतीक्षा संपली. आज मात्र ढग इतके दाटून आले की अंधारमय वातावरण ही झालं आणि तुफान पाऊस ही कोसळला. यामुळं शहरवासीयांना ताटकळत उभं रहावं लागलं. मराठवाड्यातील सोलापूर, धाराशिव जिल्ह्यासह अनेक ठिकाणी पुर्वमोसमी पावसाने हजेरी लावली.

रायगडमध्ये अखेर अवकाळी पावसानं हजेरी लावली आहे. रायगड मधील दक्षिण भागात माणगाव, महाड म्हसळा श्रीवर्धन परिसरात पावसाच्या सरी कोसळत आहेत. हवामान विभागाकडून वर्तविण्यात आलेला अंदाज खरा ठरला आहे. प्रवाशी आणि नागरिकांची तारांबळ उडाली आहे. दक्षिण रायगड नंतर आता उत्तर भागातील खालापूर, खोपोली, कर्जत परिसरात देखील पावसाची तुफान बॅटिंग झाली.

सातारा जिल्ह्यातील दुष्काळी खंडाळा तालुक्याच्या पश्चिम भागात मान्सूनपूर्व पावसाने जोरदार हजेरी लावत कण्हेरी परिसराला अक्षरशः झोडपून काढलं. वादळी वारे, विजांचा कडकडाट आणि ढगफुटी सदृश्य पावसामुळे ओढे दुथडी भरून वाहू लागले...दरम्यान, अतिट गावात वीज पडून एका गायीचा जागीच मृत्यू झाला असून शेतकरी रामदास जाधव यांचे मोठे नुकसान झाले आहे... तर कण्हेरी परिसरातील वीटभट्ट्यांवरील कच्च्या विटा भिजल्याने सुमारे पंधरा लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. खंडाळा तालुक्यातील असवली, कण्हेरी, लोहोम, कर्नवडी, घाडगेवाडी, अतिट, कवठे आणि जवळे परिसरात मुसळधार पावसाने हजेरी लावल्याने वातावरणात गारवा निर्माण झाला असला, तरी अचानक आलेल्या या पावसामुळे शेतकरी आणि वीटभट्टी चालक अडचणीत आले आहेत..

## अमेरिका-इराण युद्धाला...

प्रलंबित मुद्द्यांवर वाटाघाटी सुरू होतील, असे करारात म्हटल्याचे अल अरबियाने दिलेल्या वृत्तात म्हटले आहे.

प्रस्तावित करारामध्ये नमूद केलेल्या अटींचे पालन इराणने केल्यास अमेरिकेने लादलेले निर्बंध टप्प्याटप्प्याने उठवण्याची तरतूद करण्यात आली आहे. कराराचा मसुदा तयार करताना आंतरराष्ट्रीय कायदा आणि संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनदेचा विचार करण्यात आला आहे. अमेरिका आणि इराणकडून अधिकृत घोषणा झाल्यानंतर लगेचच कराराची अंमलबजावणी होणार असल्याचे अल अरेबियाच्या वृत्तात म्हटले आहे. पाकिस्तानी मंत्री मोहसीन नख्वी सध्या इराणमध्ये असून, त्यांनी या कराराबाबत इराणी नेत्यांशी चर्चा केल्याची माहिती समोर आली आहे.

## आई-वडील दोघेही आयएएस अधिकारी,...

असतील तर त्यांना आरक्षणाची काय गरज आहे?"

खंडपीठाने पुढे म्हटले की, शैक्षणिक आणि आर्थिक प्रगती झाल्यानंतर सामाजिक गती प्राप्त होते. पण त्यानंतरही मुलांसाठी आरक्षण मागितले जात असेल तर आपण त्यातून कधीही बाहेर पडू शकणार नाही. या मुद्द्याचीही आपण चिंता करायला हवी. आरक्षणाच्या लाभापासून पुढारलेल्या वर्गाला दूर ठेवण्यासाठी काही राज्य सरकारांनी प्रयत्न केले आहेत. मात्र आता त्याला आव्हान दिले जात आहे.

जर एखाद्या मुलाचे पालक चांगल्या नोकरीला आहेत, त्यांचे आर्थिक उत्पन्नही समाधानकारक आहे. अशा मुलांनी आरक्षण पुन्हा मागणे हे न समजण्यासारखे आहे. त्यांनी खरे तर आरक्षणाच्या बाहेर पडायला हवे. एखाद्या कुटुंबाने आरक्षणाच्या आधारावर शैक्षणिक आणि आर्थिक प्रगती साधली असेल तर त्यांनी आपल्या पुढच्या पिढीसाठी आरक्षणाच्या पात्रतेबाबत पुन्हा विचार करायला हवा, असेही निरीक्षण खंडपीठाने मांडले.

# पुष्पगिरी तीर्थावर धर्मगुरू आचार्य पुष्पदंतसागर गुरुराज यांचे मंगल आगमन २४ मे रोजी

छत्रपती संभाजीनगर दि.२२ (प्रतिनिधी)- पुष्पगिरी तीर्थाच्या पावन भूमीवर रविवार, २४ मे २०२६ रोजी विश्ववंदनीय धर्मगुरू आचार्य श्री १०८ पुष्पदंतसागरजी गुरुराज, धूल्लक श्री पर्वसागरजी आणि धूल्लक श्री प्रशांतसागरजी यांचे भव्य मंगल आगमन होणार आहे. या पवित्र प्रसंगी मानव सेवा पुष्पगिरी तीर्थ ट्रस्ट मंडळाच्या वतीने विशाल स्वागत समारंभ तसेच दिव्य धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या आयोजनाबाबत श्रद्धाळू व समाजबांधवांमध्ये विशेष उत्साहाचे वातावरण दिसून येत आहे. धर्मसभा व स्वागत समारंभाची सुरुवात सकाळी ७:३० वाजता पुष्पगिरी महाद्वारापासून होईल. यावेळी बँड-बाजा, ढोल-ताशे, पुष्पवृष्टी आणि भव्य शोभायात्रेद्वारे गुरुवर्यांचे स्वागत करण्यात येईल. सुमारे १०८ कुटुंबे व विहार सेवेशी संबंधित सेवकांना पादप्रक्षालनाचे सौभाग्य लाभणार आहे. ट्रस्ट मंडळाच्या वतीने मुख्य पादप्रक्षालन विधी संपन्न करण्यात येईल. त्यानंतर मंदिर दर्शन, आहार चर्चा, वात्सल्य भोजन व विश्रांतीची व्यवस्था करण्यात आली आहे.

MAHAGENCO
Maharashtra State Power Generation Co. Ltd.

**NOTICE INVITING e-TENDER**

| Sr. No. | Tender No. | Tender Details | Estimate Amount Rs. | EMD in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | 3000068964 | Work of dismantling and assembly of UNIT-1 stator and other allied works at Ghatghar HPS. | 77,50,000/- | 81,000/- |

**Tender Cost: Rs. 1180.00**
**Contact Person:** Superintending Engineer, RENEWABLE ENERGY CIRCLE, Ghatghar
Tel.No. 0253 2810185/2810485
For further details visit our Web site : **https://eprocurement.mahagenco.in**
1. All interested vendors are requested to register to our web site for e-tender : **https://eprocurement.mahagenco.in**
2. Actual quantum of work is to be accessed by the bidder before submitting the tender documents.

**Superintending Engineer, REC Ghatghar**